बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार,दि.३ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२६०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# बौद्ध महिलेस गुंड प्रवृत्तीच्या वसंत खेडकरकडून मारहाण

मारहाणीचा सीसीटीव्ही फुटेज झाला व्हायरल | बीड जिल्हा रुग्णालयात महिलेवर उपचार | वसंत खेडकर, पुष्पा खेडकरवर गुन्हा दाखल | पोलीस अधीक्षकांनी तातडीने चार्जशीट दाखल करावी | आरोपी वसंत खेडकरअद्यापही अटक नाही?

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरातील धानोरा रोड भागात बौद्ध समाजाच्या महिलेस, माजी सैनिकाकडून अमानुष मारहाण करण्यात आली आहे. सदरील मारहाणीचा सीसीटीव्ही व्हायरल झालेला असून जखमी महिलेवर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहे. दरम्यान या बाबत महिलेच्या फिर्यादीवरुन शिवाजी नगर पोलीस ठाण्यात आरोपी वसंत खेडकर आणि त्याची पत्नी पुष्पा खेडकर या दोघांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता बीएनएस आणि अनुसूचित जाती-जमाती कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड शहरातील धोनोरा रोड परिसरात असलेल्या, महात्मा फुले नगर भागात दिक्षा अंकुश कोरडे दाम्पत्या राहते.त्यांच्या घरासमोरच राहणारे माजी सैनिक वसंत खेडकर आणि त्यांची पत्नी पुष्पा खेडकर सतत जातीय मानसिकतेतून लोकांना नाहक त्रास देतात. गेल्या दोन दिवसांपूर्वी वसंत खेडकर याने दारुच्या नशेत मुले रस्त्यावर खेकण्याच्या किरकोळ करणातून जानिवपूर्वक जातीय द्वेष बाळगून दिक्षा कोरडे यांना मारहाण केली. या मारहाणीत दिक्षा कोरडे जखमी झाल्या आहेत.गुंड प्रवृत्तीच्या वसंत खेडकरचे जातीवादी वर्तन सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून तो व्हिडीओ सर्वत्र व्हायरल झाला आहे. पोलिसांना दिलेल्या तक्रार अर्जात दिक्षा कोरडे यांनी म्हंटले आहे की, वसंत खेडकर आणि त्याचे कुटुंब यांच्यापासून माझ्या कुटुंबाला जिवीताचा धोका निर्माण झाला आहे. स्वतःला माजी सैनिक म्हणवून घेणारा व्यक्ती एका महिलेस मारहाण करत असेल तर तो अतिशय गुंड प्रवृत्तीचा आहे. दिक्षा कोरडे यांनी फिर्यादीत असही नमूद केलं आहे की, वसंत खेडकर याने माझ्या केसाला धरुन, नको तिथे लाथा मारल्या आहेत. तसेच हा सर्व प्रकार माझ्या लहान मुलांसमोर घडला असून त्यांनाही मारहाण झाली आहे. त्यामुळे त्यांचे बालमन भयभित झाले आहे.पोलीस अधीक्षक यांनी या प्रकाराची अतिशय गंभीरतेने दखल घेऊन आरोपीस कडक शासन करावे, अशी मागणी केली आहे.

**महिलेवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु**

बौद्ध महिला दिक्षा कोरडे यांना, माजी सैनिक वसंत खेडकर याने किरकोळ करणातून जबर मारहाण केली आहे.या मारहाणीत दिक्षा कोरडे जखमी झाल्या असून त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



## वसंत खेडकरवर दाखल झालेले गुन्हे

बीड शिवाजी नगर पोलीस ठाण्यात वसंत खेडकर आणि त्याची पत्नी पुष्पा खेडकर या दोघांच्या गुंड प्रवृत्ती विरोधात भारतीय न्याय संहिता बीएनएस, २०२३ कलमानुसार,७४,७९,११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) तर अनुसूचीत जाती आणि अनुसूचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ नुसार ३(१)(आर), ३ (१) (एस), ३(१) (डब्ल्यू) (ळ), ३ (१) (डब्ल्यू) (ळळ), ३(२) (व्हिए) कलमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



धानोरा रोड परिसरातील दीक्षा कोरडे व त्यांची मुलं यांना माजी सैनिक काकडून झालेल्या अमानुष मारहाणीचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करतो आणि खेडकर नामक माजी सैनिकावर पोलीस प्रशासनाने कडक कारवाई करावी एक दिवसांमध्ये चार्जशीट सबमिट करावी. जेणेकरून महिलेंवर अन्याय अत्याचार करणाऱ्यांना याची जरब बसेल.

– अजय सरवदे
जिल्हाध्यक्ष,वंचित बहुजन आघाडी बीड



बीड शहरात बौद्ध समाजाच्या महिलेस जातीय द्वेषातून झालेली मारहाण अतिशय निषेधार्थ बाब आहे. समाजात आशा घटना घडू नयेत म्हणून आरोपी विरोधात तातडीने चार्जशीट दाखल करुन त्याला कडक शासन करावे.

–ॲड.राजेश शिंदे

# शिवसेना शिंदे गटात जाहिर प्रवेश

## निवड: अनिलदादांच्या उपस्थितीत अशोक दुधाळांचा प्रवेश



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ यांची शिवसेना बीड तालुका ओबीसी / व्हिजेएनटी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना बीड जिल्हाप्रमुख मा. अनिल दादा जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत, ओबीसी / व्हिजेएनटी सेल जिल्हाप्रमुख श्री. मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून पार पडली.

अशोक दुधळ हे सामाजिक प्रश्नांवर सातत्याने काम करणारे कार्यकर्ते असून, ओबीसी व व्हिजेएनटी समाजाच्या हक्कांसाठी नेहमी पुढाकार घेत आले आहेत. त्यांच्या या नियुक्तीमुळे स्थानिक पातळीवर ओबीसी आणि व्हिजेएनटी समाजाला नवी दिशा व बळ मिळेल, असा विश्वास पक्षाने व्यक्त केला आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची निष्ठा व संघटन कौशल्य, तसेच शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा ▸▸ पान २ वर

# महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण




पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:महाराष्ट्र दिनानिमित्त संत बाळू देव महाराज विद्यालय पाटोदा व महिला कॉलेज पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री.दत्ता देशमाने (पत्रकार तसेच माणुसकीची भिंत सेवाभावी संस्थेचे ▸▸ पान २ वर

# काँग्रेसचा सद्भावना संकल्प सत्याग्रह

बहादुरभाई:परळी परिसरातील नागरिकांनी सहभागी व्हावे | हर्षवर्धन सपकाळ,खा. रजनीताई पाटीलांसह नेत्यांचा सहभाग

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:राज्यात सामाजिक सौहार्द व महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचे आयोजन केले आहे. दिनांक ३ मे रोजी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये प्रदेश काँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प सत्याग्रह आयोजित केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या सत्याग्रहात काँग्रेसच्या नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते व जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे अदी नेते पदाधिकारी सहभागी होणार आहेत परळी शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्याग्रहात सहभागी व्हावे असे आवाहन माजी शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केले आहे.

राज्यात नुकत्याच घडलेल्या विविध घटनांनी राज्यातील सामाजिक शांतता भंग करण्याचे काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी राज्यात काही शक्ती जाणीवपूर्वक वातावरण बिघडवून महाराष्ट्र अस्थिर व अशांत ठेवण्याचे पातक करत आहेत. दुर्दैवाने या विघातक ▸▸ पान २ वर

# ग्रामीण तरुणांना उद्योजक बनविणार!

## ना.पंकजा मुंडे: परळीत पशूपालकांची कार्यशाळा

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:पशूसंवर्धन विभागामार्फत पशूपालन आणि शेतीशी निगडित अनेक चांगल्या योजना राबविल्या जात आहेत. विभागांतर्गत सुरु असलेल्या योजनांतून ग्रामीण भागातील तरुणांना उद्योजक आणि लखपती बनवायचे आहे. तरुणांना स्वावलंबी बनवणाऱ्या वेगवेगळ्या योजना राबवून 'ग्रामीण उद्योजक' अशी ओळख जिल्ह्यातील तरुणांना मिळवून देऊ असा विश्वास राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे व्यक्त केला.महाराष्ट्र शासनाच्या पशूसंवर्धन विभाग आणि राष्ट्रीय पशूधन अभियातंर्गत शहरात प्रथमच आज पशूपालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी जिल्ह्यातील पशू पालकांशी संवाद साधताना उदघाटन पर भाषणात ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. पशूसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पशुसंवर्धनचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे, जि.प. चे अतिरिक्त सीईओ वासुदेव सोळंके, प्रादेशिक सह आयुक्त गणेश देशपांडे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या प्रारंभी ना. पंकजाताई मुंडे यांनी गोधनाचे औक्षण करून पुष्पहार अर्पण करून स्वागत केले. तसेच कार्यक्रमस्थळी पशूपालन आणि शेतीपूरक संकल्पनांची माहिती देणाऱ्या विविध स्टॉल्सना ▸▸ पान २ वर

जयभिम उत्सव | पप्पू कागदेंचे विविध ठिकाणी प्रतिपादन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगाचे प्रेरणास्त्रोत

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मामुळे उपेक्षितांची हजारो वर्षाची गुलामगीरी नष्ट झाली. पूर्वीच्या काळात दगडाला किमंत होती. परंतु माणसाला नव्हती. हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील उपेक्षीत समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांची सामाजिक शैक्षणिक, आर्थिक व राजकिय प्रगती करण्यासाठी २ वर्ष ११ महीने १८ दिवस परिश्रम घेउन भारतीय संविधानाची निर्मीती करून तमाम भारतीयांना लोकशाही बहाल केली. भारतीय संविधानामुळेच आज या देशातील ३६ राज्य, १० धर्म व ६ हजार ५०० जाती ७५ वर्षापासून एकत्र बांधून ठेवलेल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विचारांचे विद्यापीठ होते. त्यांच्या कार्यामुळे, कर्तृत्वामुळे ते जगाचे प्रेरणा स्त्रोत आहेत.असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमित्त कामखेडा, रूई, मोरगांव, नायगांव, खापर पांगरी या गावी केले.

पूढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३२ पदव्या संपादीत केल्या त्याचे जगातील ११ भाषावर प्रभुत्व होते. समाज बांधवांना सज्ञान करण्यासाठी ५ वृतपत्रे सुरू केली. शिक्षण सक्तीचे व मोफत करून शिक्षण स्वातंत्र्य दिले. उपेक्षीतांच्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मिलींद महाविद्यालय, सिध्दार्थ महविद्यालयाची उभारणी केली. मताचा अधिकार देवून तमाम भारतीयांना मतदार राजा बनविले. काळाराम मंदिर प्रवेश, चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन या सारखी मानवा – अधिकारांची आंदोलने उभी केली. रिजर्व बँकेची स्थापना केली. हिंदु कोड बील संसदेत मंजूर ▸▸ पान २ वर

# काळेगावघाट पुलाचे काम विदाऊट!

## बोंबला:बस वळण्यासाठी मोठे संकट



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: तालुक्यातील काळेगाव घाट येथे भुरट्या कादरी नावाच्या गुत्तेदारांने जाणिवपूर्वक पुलाचे काम विदाऊट केले आहे अशा गुत्तेदारांना अक्कल कमी आणी पगार वाढवला पाहिजे कारण काळेगाव घाट येथील पुलाचे काम करुन काही उपयोग झाला नाही कारण एसटी महामंडळाची बस वळण्यासाठी खुप मोठा अडथळा निर्माण झाला आहे व अडथळ्या मुळे जिवीतहानी सुध्दा होऊ शकते ▸▸ पान २ वर

## जातीनिहाय जनगणना

लोकसभेतील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांनी सातत्याने लावून धरलेली जातनिहाय जनगणनेची मागणी अखेर केंद्र सरकारने मान्य केली. बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. पुढील जनगणनेत केंद्र सरकार जातनिहाय जनगणना करेल असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत घोषित केले. काँग्रेसनेच सातत्याने जातनिहाय जनगणनेला विरोध केल्याचा दावाही त्यांनी केला. म्हणजेच हा प्रकार 'चोराच्या उलट्या बोंबा' सारखा झाला. कारण जातनिहाय जनगणना करा अशी मागणी राहुल गांधी यांनी सातत्याने लावून धरली होती. पहलगाम हल्ल्याला लष्करी प्रत्युत्तर देण्याची रणनीती तयार केली जात असतानाच बुधवारी केंद्र सरकारने अचानक जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली.

बिहार विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना हा निर्णय घेऊन भाजपने देशाच्या राजकारणाला कलाटणी देण्याचा प्रयत्न केल्याचे मानले जात आहे. पहलगाममधील हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांनी जात बघून नव्हे, धर्म विचारून हत्या केल्या, असा युक्तिवाद भाजपकडून केला जात असतानाच बुधवारी केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतल्यामुळे भाजपच्या वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या दबावामुळे केंद्राला हा निर्णय घ्यावा लागला असून केंद्राला सलग तिस-यांदा धोरणात्मक माघार घ्यावी लागल्याची चर्चा आहे. जातनिहाय जनगणनेची मागणी करून जाती-जातीमध्ये भेद निर्माण करणारे विभाजनवादी राजकारण काँग्रेस करत असल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपच्या नेत्यांनी केला होता.

पहलगाम हल्ल्यानंतर धर्माच्या आधारावरील राजकारण भाजप व केंद्र सरकारसाठी अडचणीचे ठरू लागल्याने जातनिहाय जनगणनेचा उतारा शोधण्यात आल्याचे बोलले जात आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातगणनेच्या मुद्यावरून वर्षभराहून अधिक काळ केंद्र सरकार व भाजपला लक्ष्य केले होते. भाजप ओबीसींची मते मिळवत असला तरी सरकारी नोक-यांमध्ये ओबीसींना स्थान दिले जात नाही. भाजपने ओबीसींवर अन्याय केला आहे. जातगणना करून ओबीसींना आरक्षणाचा लाभ मिळवून दिला पाहिजे, असे राहुल गांधींनी लोकसभेत सांगितले होते. केंद्राच्या घूमजावमुळे भाजपला राहुल गांधींसमोर माघार घ्यावी लागल्याचे चित्र आहे. यापूर्वी राहुल गांधींनी भूसंपादन विधेयकाला विरोध केला होता. त्यानंतर वादग्रस्त तीन कृषि कायद्यांविरोधातील शेतक-यांच्या आंदोलनाला राहुल गांधींनी पाठिंबा दिला होता. हे दोन्ही कायदे रद्द करत मोदी सरकारला भूमिका बदलावी लागली होती. जातनिहाय जनगणनेची घोषणा करून सरकारने राहुल गांधींच्या धोरणाला एका अर्थी पाठिंबा व्यक्त केला आहे. राहुल गांधींनी केंद्र सरकारला झुकण्यास भाग पाडल्याचे भाजपच्या वर्तुळात बोलले जात आहे.

मोदी सरकारने काँग्रेसच्या जातनिहाय जनगणनेचा व आरक्षणाचा दृष्टिकोन स्वीकारला असल्याचे मत राहुल गांधींनी व्यक्त केले. आम्ही जातनिहाय जनगणना करून दाखवू असे आश्वासन काँग्रेसने संसदेत दिले होते. त्याला मोदींनी विरोध केला होता. पण ११ वर्षांनंतर मोदी सरकारने जातगणनेची घोषणा केली. हा बदल का झाला ते माहीत नाही, असे म्हणत राहुल गांधींनी काँग्रेसच्या दबावापुढे केंद्र सरकार नमल्याचे अप्रत्यक्षपणे सूचित केले. देशात जनगणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. आमचा त्यास पाठिंबा आहे. मात्र या जनगणनेची सुस्पष्ट अशी कालमर्यादा सरकारने स्पष्ट करावी. ही जनगणना नेमकी कधी पूर्ण होईल याचा कार्यक्रम जाहीर करावा अशी प्रतिक्रिया राहुल गांधी यांनी दिली. कोणत्याही कारणाने का होईना सरकारने निर्णय घेतला हे महत्त्वाचे आहे. भारतात २०११च्या जनगणनेनंतर अद्याप जनगणना झालेली नाही. २०२१ मधील जनगणना कोरोना महामारीच्या कारणामुळे स्थगित करण्यात आली होती. त्यामुळे लोकसंख्येची ताजी आकडेवारी उपलब्ध नाही. पुढील जनगणना कधी होणार याची सरकारने अजून घोषणा केलेली नाही. जात जनगणनेची मागणी केवळ मोदी सरकारच्या काळात झाली असे नाही. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए-२ राजवटीतही जातनिहाय जनगणनेची मागणी करण्यात आली होती. देशात प्रथमच जात जनगणना होत आहे, असे नाही. स्वातंत्र्यापूर्वी जनगणनेत सर्व लोकांची जात विचारली जात असे. १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जातीशी संबंधित माहिती गोळा न करण्याचा निर्णय घेण्यात आला. जातीविषयी तपशील विचारल्याने जाती व्यवस्थेची मुळे खोलवर जातील, अशी भीती होती. मात्र, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील लोकांची मोजणी सुरूच राहिली. म्हणजेच देशात या प्रवर्गातील लोकांची गणना केली जात होती. परंतु इतर मागासवर्गीय (ओबीसी) आणि सामान्य प्रवर्गातील लोकांची गणना केली जात नाही.

जनगणना ही कोणत्याही देशाच्या आणि समाजाच्या विकासाच्या साखळीतील एक कडी असते. जनगणनेच्या आकडेवारीद्वारेच सरकारला सामान्य नागरिक आणि कुटुंबाबद्दल अचूक माहिती मिळते. जनगणनेदरम्यान, केवळ लोकांची संख्याच मोजली जात नाही तर त्यांचे कुटुंब, धर्म, भाषा, शिक्षण, रोजगार आणि सुविधांबाबतचीही माहिती संकलित केली जाते. सरकारकडून चालवल्या जाणा-या योजनांचा सामान्य लोकांपर्यंत किती लाभ मिळाला हे जाणून घेण्यासाठी सरकारला ही माहिती उपलब्ध होते. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेत लोकांना एकूण २९ प्रश्न विचारण्यात आले होते. परंतु त्यात जातीशी संबंधित प्रश्नाचा समावेश नव्हता. सरकारने २०११ मध्ये 'सामाजिक-आर्थिक आणि जात जनगणना'ही केली होती.

# निरोगी आयुष्याच्या दिशेने वाटचाल!

## कार्यक्रम:केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधवांचे मत

पुण्यभूमी प्रतिनिधी

पुणे:आयुष क्षेत्रात विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी केलेल्या प्रगतीवर प्रकाश टाकून, तसेच त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी करत, राष्ट्रीय आयुष मिशन (छ्च्) परिषद २०२५ आज कैवल्यधाम, लोणावळा येथे सुरू झाली. देशभरात आयुष सेवांचा विस्तार करण्यासाठी तसेच त्यांना एकत्रित आणण्यासाठी भविष्यातील आराखडा आखण्यासाठी या कार्यक्रमाने भक्कम पाया तयार केला आहे. आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आयुष/आरोग्य मंत्री, विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेश सरकारमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दोन दिवसांच्या परिषदेचे उद्घाटन केले.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने आयोजित केलेल्या या परिषदेत आयुष तज्ज्ञ, धोरणकर्ते,



आरोग्य व्यावसायिक, संशोधक व नवोदितांना एकत्र आणले आहे. पारंपरिक भारतीय औषध प्रणालीचा समावेश मुख्य प्रवाहातील आरोग्यसेवेत करून आरोग्यसेवा क्षेत्राला बळ देणे, ज्यायोगे सामान्य नागरिकांसाठी अधिक सुलभ, परवडणारी व पुराव्यावर आधारित आरोग्य सुविधा देणे, हे या परिषदेचे उद्दिष्ट आहे. या परिषदेचा कल निश्चित करताना केंद्रीय आयुष राज्यमंत्री म्हणाले, मंत्रालयाने २०२३ मध्ये नाम परिषदेचे आयोजन केले होते, जिथे विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील मंत्री तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाम योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मौल्यवान दृष्टिकोन सामायिक केला होता.संवादामुळे राष्ट्रीय आयुष मोहिमेची अंमलबजावणी व परिणाम यासाठी सुधारित कृती आराखडा तयार करण्यात आला. या यशाने प्रोत्साहन मिळाल्याचे नमूद करत, केंद्रीय मंत्री पुढे म्हणाले, मला विश्वास आहे, की राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेची ही दुसरी आवृत्ती राज्ये/केंद्रशासित प्रदेश व केंद्र सरकार दोघांकरिता संयुक्तपणे मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी, प्रशासन व्यवस्था मजबूत करण्यासाठी, नवीन उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी, आर्थिक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व तळागाळापर्यंत कार्यक्रमांची जलद तसेच प्रभावी अंमलबजावणी खात्रीशीर करण्यासाठी एक सशक्त व्यासपीठ म्हणून काम करेल.

# केज नगरपंचायतीच्या वतीने टँकरने पाणीपुरवठा सुरू

बीड/प्रतिनिधी

केज शहरातील तहानलेल्या शिक्षक कॉलनी भागात आजपासून टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. केज नगरपंचायतला केज शहरातून सर्वाधिक महसूल देणाऱ्या शिक्षक कॉलनी भागात पाणी पुरवठा योजना नसल्यामुळे या भागात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत असते. या वर्षी कडक उन्हाळा पडल्यामुळे या भागातील बोरवेल पूर्णपणे आटले आहेत. पाण्यासाठी वणवण भटकत पाणी मिळवणे किंवा विकत पाणी घेणे येवढेच पर्याय सद्या या भागातील रहिवासी लोकांच्या नशिबी आले होते. परंतु केज नगरपंचायतीच्या वतीने आज पासून शिक्षक कॉलनी भागात टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आल्यामुळे या भागातील रहिवासी गटनेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सिताताई बनसोड , नगरसेवक बाळासाहेब गाडवे, बालाजी जाधव व नगरपंचायत विभागाचे आभार मानत आहे.

शिक्षक कॉलनी भागातील पत्रकार प्रकाश मुंडे यांचे चिरंजीव राहुल मुंडे यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले होते .राहुल मुंडे यांच्या स्मरणार्थ या भागात नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या राहुल मुंडे प्रतिष्ठान, युवा नेते खय्युम शेख , पत्रकार प्रकाश मुंडे, पिंटू भैय्या तांदळे, एम डी घुले सर, अरुण बप्पा धस सर ,सुधाकर ढाकणे सर, अमोल धस, सोनू धस, रुद्रा तांदळे, रतन वाघमारे व नागरिक तसेच महिला मंडळ यांनी पाण्याची टाकी व पाइपलाइनने पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करावा ही मागणी लावून धरली होती ही मागणी मान्य केल्यामुळे गटनेते हारुण भाई इनामदार व नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## पान एक वरून

**शिवसेना शिंदे गटात जाहिर**

हिंदुत्वाचा वारसा हे प्रेरणास्थान मानून, अशोक दुधाळ हे पक्षवाढीच्या कामात स्वतःला झोकून देतील आणि सर्व घटकांना बरोबर घेऊन प्रभावीपणे कार्य करतील, अशी अपेक्षा वरिष्ठ नेतृत्वाकडून व्यक्त करण्यात आली आहे. नियुक्तीनंतर अशोक दुधाळ यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ही जबाबदारी मोठी असून, पक्ष नेतृत्वाने दाखवलेल्या विश्वासाला मी पात्र ठरेल. समाजाच्या न्याय हक्कांसाठी मी संघर्ष करत राहीन आणि शिवसेनेच्या ध्येयधोरणांनुसार कार्य करीन.

**ग्रामीण तरुणांना उद्योजक**

भेट देऊन त्यांची पाहणी करत माहिती जाणून घेतली. याप्रसंगी कार्यशाळेला उपस्थित पशूपालक आणि शेतकऱ्यांना त्यांनी संबोधित केले.यापूर्वी मंत्री व जिल्ह्याची पालक मंत्री असताना जिल्हयात ग्रामविकास, जलसंधारण, महिला बालविकास खात्याच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या, भरपूर निधी आणला. विकासाची अनेक कामे केली. आता पशूसंवर्धन खाते माझ्याकडे आले आहे. हे खाते तसे श्रीमंत खाते आहे, त्यामुळे यातून चांगली कामे करता येतील. या खात्याच्या विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण तरुणांना स्वावलंबी करण्यासाठी ही कार्यशाळा संपूर्ण राज्यात घेत आहोत. तुमचे हाथ मजबूत करण्यासाठी मी काम करणार आहे. तरुणांनी पशूधनाचे प्रकल्प आणि त्याच्याशी निगडित उद्योग उभारले तर त्यावर पन्नास टक्के सबसिडी मिळते. इतर उद्योगांपेक्षा पशूपालनासारखे उद्योग केले तर मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण उद्योगांसाठी एकात्मिक योजना आणून या उद्योगाला शेतीचा दर्जा मिळवून देणार असल्याचेही ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.कार्यशाळेस जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त डॉ आर डी कदम, पशुसंवर्धन अधिकारी डॉ देशमुख, सह आयुक्त डॉ पांडे, गट विकास अधिकारी संजय केंद्रे, पशूधन विकास अधिकारी डॉ प्रकाश आघाव आदी उपस्थित होते.

**लखपती उद्योजक संकल्पना**

लखपती दीदी योजने सारख्या लोकाभिमुख संकल्पनेप्रमाणे पशूपालकांना लखपती जोडपे अशी ओळख मिळवून देण्याचा आपला मानस असल्याचेही ना. पंकजाताई यावेळी म्हणाल्या. अशा अनेक योजना आपण पशूसंवर्धन मार्फत राबवत आहोत, या योजनांचा अधिकाधिक फायदा घ्या, कार्यशाळेला विभागाच्या अभ्यासू अधिकाऱ्यांची टीम उपस्थित आहे, त्यांच्याकडून माहिती मिळवून इतरांनाही योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी याप्रसंगी केले.

**काँग्रेसचा सद्भावना संकल्प**

शक्तींना सत्तेतून आशिर्वाद मिळत आहे. परंतु काँग्रेस पक्ष राज्यातील विविध जाती धर्मातील लोकांमधील एकता कायम रहावी व सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी सद्भावना यात्रा काढत आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड आणि परळी परिसरातील घटनांमुळे या परिसरात सद्भावनेची आवश्यकता असल्याने परळीतील मोंढा परिसरातील गांधी स्मारक स्तंभ येथे हा सद्भावना संकल्प सत्याग्रह होत आहे, या सत्याग्रहाला परळी आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठित नागरिक अशा सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष बहादुरभाई परळी यांनी केले आहे.

**महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण**

सचिव) उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या प्रसंगी उद्योजक संजय शेठ कांकरिया महिला कॉलेजचे प्राचार्य, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात महाराष्ट्राच्या इतिहासाची उजळणी करत राज्याच्या प्रगतीचे संकल्प करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये देशप्रेम आणि सामाजिक जाणीव वाढवण्याचा सकारात्मक संदेश दिला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

करुन स्त्रियांना शिक्षणासह सर्वच क्षेत्रात स्वातंत्र्य दिले. भारत हा शेती प्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक बाजूने मजबूत करण्यासाठी पंजाब राज्यात भाक्रा नांगल धरणाची निर्मीती करून नदीजोड प्रकल्पाची संकल्पना राबविली. अंधश्रद्धेत व कर्मकांडात अडकलेल्या उपेक्षीत समूहांना बुद्ध धम्माचा मार्ग दिला. भारताचे संविधान लिहून सर्व मानव जातीचा उध्दार केला. त्यामुळे प्रत्येकांच्या आयुष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उपकार आहेत. ते कधीही फेडता येणार नाहीत. एवढे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे. त्यामुळे १४ एप्रिल हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याला व कर्तृत्वाला अभिवादन करण्याचा दिवस आहे. यावेळी राजु जोगदंड, किसन तांगडे, बापू पवार, प्रशांत वासनिक, विक्रम शेंडगे, किरण वाघमारे, रवि वाघमारे, कालीदास नवळे, गणेश पगारे, प्रमोद शिंदे, धम्मा पारवेकर, रणजीत सिनगारे, महेश कागदे, संजय कवठेकर, सिध्दार्थ वाघमारे, संदिप कवठेकर किरण वाघमारे, बाळासाहेब गव्हाणे, संतोष जाधव, गोविंद जाधव, अशोक जाधव, शेख बिलाल, शेख शफीक, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, विनोद शेजवळ, आकाश वाघमारे, प्रदिप थोरात, विशाल वाघमारे, यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

**काळेगावघाट पुलाचे काम**

कारण वळन घेते वेळ वाहन चालकांना जिव धोक्यात घालून एसटी वळवावी लागत आहे व एसटी महामंडळाची बस वळत नसेल तर सर्वसामान्य वाहान चालकांनी काय जिव द्यायचा आहे का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे कारण आवजड वाहन चालकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे व दीडशहान्या कादरी नावाच्या भुरट्या गुत्तेदारांने काम गावकऱ्यांच्या मागणी प्रमाणे केले नाही त्यामुळे काळेगाव घाट मध्ये पुलाचे काम म्हणजे जिवदान झाले आहे त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांनी कार्यवाही करण्यात यावी व पुल दुरुस्ती करुन देण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## पान सहा वरून

**लोणार मार्गे नवीन बस फेऱ्या**

आली आहे सदर फेरी परतुर येथुन सकाळी ०६:४५ वाजता निघून ती वाटुर फाटा,मंठा,लोणार,मेहकर, मालेगाव,वाशिम,मंगरुळपीर,कारंजा,अमरावती,तिवसा, कोंढाळी मार्गे सायंकाळी ०५:०० वाजता नागपूर येथे मुक्कामी पोहचते तर नागपूर येथुन सकाळी ०५:३० वाजता ही फेरी परतुर करीता सुटते तसेच परभणी विभागाअंतर्गत येत असलेल्या गंगाखेड,परभणी,जिंतुर आणि पाथरी आगाराकडुन गंगाखेड-बुलडाणा, जिंतुर-शेगांव, परभणी-बुलडाणा, पाथरी-बुलडाणा ह्या दिवस बसफेऱ्या सुरू करण्यात आले आहे,प्रवाशांनी या बसफेऱ्यांचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रवासी सेवा संघटना,लोणार यांनी केले आहे.

**महात्मा बसवेश्वर समतेचे**

कोचर,युवक काँग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे, शुभम चांटे, तसेच शहरातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते समाज बांधवाच्या उपस्थित मिरवणूक शांततेत पार पाडली यावेळी लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार निमेश मेहत्रे यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस उपनिरीक्षक गणेश इंगोले, पीएसआय इंगळे ए एस आय प्रेमकुमार राठोड, खुपीया विभागाचे संतोष चव्हाण, ज्ञानेश्वर शेळके पोलीस कानिसटेबल, एसआय सर्जेराव तौर,महिला पोलीस अंमलदार सविता राठोड, विठ्ठल चव्हाण, ट्राफिकचे गीते,शेजुळ, प्रल्हाद कायंदे, रवी चव्हाण,यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

**इंग्रजी माध्यमाच्या निवासी**

होणारा संपूर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार असून योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, रिलायन्स मॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्याबाबतचे आवाहन प्रकल्पाधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

**शिवसंग्रामने फुंकिले**

समाज नाही ज्याने शिवसंग्रामने सदस्यता घेतली नाही. मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाजतील लोकांनी सहभाग घेतला आहे, याप्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे , रामदास नाईकवाडे, ज्ञानेश्वर कोकाटे, मनोज जाधव ,सुनील शिंदे ,शेख कुतुब भाई, शेख आबेद, संगीता ठोसर, शेषेराव तांबे, सुशील कांबळे, कैलास शेजाळ, विठ्ठलराव ढोकणे, राजेंद्र आमटे , अशोक लोकरे, रायचंद कापसे, देविदास मेंगडे , धर्मराज मागदे, पंडित शेंडगे ,हरीचंद्र ठोसर, गणेश धोंडरे,संदीप नवले, ओकार पाटील, आदी उपस्थित होते.

**बीडमध्ये गौरव रथयात्रेचे**

कार्याध्यक्ष शिवाजी बनकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, तसेच बळीराम गवते, शेख तय्यब, शेख निजाम, हारून इनामदार, फारूक पटेल, नगराध्यक्ष सीता बनसोड, बाजीराव धर्माधिकारी, प्रा. ईश्वर मुंडे, रेखा फड, ड. प्रज्ञा खोसरे, दीपक घुमरे, प्रिया डोईफोडे यांच्यासह राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर ही महाराष्ट्र गौरव रथयात्रा गेवराईच्या दिशेने पुढे मार्गस्थ झाली.

**तापमानाचा बसला मोठा**

आटोक्यात आणण्यात यश आले.कारखान्याच्या प्राथमिक अंदाजानुसार १०० मे.ट.बगॅज, रबर बेल्ट सी सी ४ ,बी सी ३,बी सी-८ व ट्रॅश कटर,इलेक्ट्रिक मोटार, केबल, डलर, ड्रम आदि साहित्य जळाल्या प्राथमिक अंदाज आहे.त्यामुळे आगीत कारखान्याचे लाखो रू नुकसान झाले आहे.गेल्या कांही दिवसांपासुन तापमानात मोठी वाढ होत असुन, अति तापमानामुळे ही आग लागल्याची शक्यता प्रत्यक्षदर्शी वर्तवत होते. दरम्यान आगीची माहिती कारखान्याने दिंद्रुड पोलीस ठाण्यात दिली आहे.

**जिवाचीवाडीत पाणीप्रश्न**

तक्रार देऊन कुठल्याही प्रकारची कारवाई झाल्याचे दिसून आले नाही तरी आपल्या स्तरावर कारवाई करण्यात यावी. आशी विनंती करतो. आपल्या स्तरावर कारवाई समाधानकारक नाही झाल्याच्या नंतर वरिष्ठ कार्यालयात आपल्या कार्यालया कडे निवेदनाद्वारे सुभाष सारुक यांनी म्हटले आहे.

**राहुरीत सरकारी धान्यावर**

अधिकारी सामील आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गोर गरीबांचे धान्य चोरणाऱ्या या भामट्यांची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी, तसेच त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांमधून होत आहे. सदर गोडाऊन किपर व मुकादम यांची वरिष्ठ पातळीवरून चौकशी न झाल्यास तसेच गोर गरीबांचे अन्न धान्य चोरणाऱ्यांवर कारवाई न झाल्यास वंचित बहुजन आघाडी च्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पिंटूनाना साळवे यांनी दिला.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# खाऊगल्ली ऐवजी गार्डन, कोपरीकरांचा विजय!

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य स्मारक परिसरात महापालिकेकडून गार्डन बांधण्यासाठी सुरुवात




**प्रशांत सिनकर**

**ठाणे :** कोपरीत चटपटीत खाद्य पदार्थांच हब होत असताना ठाणे महापालिका प्रशासनाचा नको त्या जागेत नव्या खाऊ गल्लीचा घाट घालण्याचा प्रयत्न होता. नव्यानेच उभारलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य स्मारक परिसरात होणाऱ्या खाऊ गल्लीचा स्थानिकांचा कडाडून विरोध असल्याने या बाबत 'प्रहार'मध्ये दिलेल्या वृत्तानंतर आता मोकळ्या जागेत बच्चे कंपनीसाठी गार्डन, ओपन जीम आकार घेत असल्याने कोपरीकरांनी आनंद व्यक्त करत 'प्रहार'चे आभार मानले आहेत.

ठाण्यातील शांतता प्रिय भाग अशी ओळख असणारा कोपरी भाग आता खवय्यांसाठी मोठी पर्वणी आहे. शाकाहारी मांसाहारी बरोबर चटपटीत खाद्य पदार्थ मिळत असल्याने ठाण्या बरोबर मुंबई आसपासचे खवय्ये कोपरीत खाण्याचा आनंद लुटण्यासाठी येतात. कोपरीत खाद्य विक्रेते हे रस्त्यावर स्टॉल लावतात. याला कुठे तरी नवीन आयाम देण्याचा प्रयत्न पालिकेकडून होत आहे. यासाठी मोकळी जागा शोधताना, कोपरीत नवीच उभारलेल्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य स्मारकाशेजारील मोकळ्या जागेत ही खाऊगल्ली तयार करण्यासाठी ठाणे महापालिका आग्रही होती; परंतु या खाऊगल्लीला जवळील स्थानिक सोसायटीतील रहिवाशांचा तीव्र विरोध आहे.

यासंदर्भात नुकतीच प्रहारमध्ये दिलेल्या बातमीनंतर या जागेवरील खाऊगल्ली बांधण्याचा विचार पालिकेने सोडून दिला आहे.

### गार्डन, ओपन जिम गार्डनची होणार उभारणी

**ठाणे (पूर्व):** येथील शंकर सोसायटी, संतोषी माता सोसायटी, सुनील राज सोसायटी, जय-नटराज, रचना-निरज सोसायटींच्या कंपाऊंडलगत ही खाऊ गल्ली तयार केली जाणार होती.


शब्दांना सत्याची धार
प्रहार
कोपरीत खाऊगल्ली स्टॉल उभारणीला स्थानिकांचा कडाडून विरोध!
प्रशांत सिनकर

या खाऊगल्ली विरोधात स्थानिक एकवटले आणि अशातच नागरिकांची बाजू ओळखून 'प्रहार'मध्ये दिलेल्या 'कोपरीत खाऊगल्ली स्टॉल उभारणीला स्थानिकांचा कडाडून विरोध' या मथळ्याखाली बातमी आली. त्यानंतर महापालिकेने या मोकळ्या जागेत लहान मुलांसाठी, ज्येष्ठ नागरिक गार्डन आणि ओपन जिम गार्डन उभारले जाणार आहे. तसे गार्डनचे काम देखील वेगाने सुरू असल्याचे दक्ष नागरिक संतोष सुर्वे यांनी सांगितले. नवीन खाऊगल्ली बांधताना रस्त्यावरील स्टॉल धारकांना ते देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. मात्र प्रश्न असा आहे की यासाठी कोणता निकष लावला जाणार आणि या नव्या खाऊगल्लीमुळे रस्त्यावरील खाद्य विक्रेते रस्ता मोकळा करणार का ? असा सवालही उपस्थित केला जातो आहे.

## घोडबंदर गावात अवतरले हरीण

**भाईंदर :** संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिक्षेत्रात असलेल्या मीरा रोडच्या घोडबंदर गावात जंगलातील वाट चुकून एक हरीण नागरी वस्तीत आल्याची घटना समोर आली आहे. रात्रीच्या वेळी पाण्याच्या शोधात असलेली हरीण जंगलातील वाट चुकून घोडबंदर गावात आली. हरिणीच्या मागे कुत्रे भुंकू लागले. त्यामुळे गोंधळलेले हरीण सैरावैरा पळू लागले. त्यात ते झाडी झुडपात अडकले गेले. स्थानिक नागरिकांनी मीरा भाईंदर महापालिका अग्निशमन दलाला याची माहिती दिली असता अग्निशमन दलाच्या जवानांनी हरिणीची सुरक्षित सुटका केली. वन विभागाला याची माहिती दिली असून हरिणीला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात सोडण्यात येणार आहे.



## वेचक

### 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'चे तीनदिवसीय आयोजन

**कल्याण :** सनातन संस्थेच्या माध्यमातून गेली २५ वर्षे अविरतपणे हिंदू राष्ट्रासाठी जागरण करत असलेले डॉ. जयंत आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ महोत्सव नसून भारताला पुन्हा तेजस्वी, समर्थ बनवण्याचा आणि सनातन धर्माची पुनर्स्थापना करण्याचा जागर आहे, असे गौरवोद्‌गार 'श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासा'चे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी यांनी महोत्सवासाठी पाठवलेल्या शुभसंदेशात काढले आहेत. या महोत्सवात विविध राष्ट्रनिष्ठ नेते, धर्माचार्य, कार्यकर्ते आणि सनातनप्रेमी एकत्र येऊन विचारमंथन करणार आहेत. या मंथनातून केवळ नवनीत नव्हे, तर अमृत उदयाला येईल आणि याच अमृतकलशातून सनातन राष्ट्राला नवतेज प्राप्त होईल. भारताच्या सामर्थ्यावरच जगात समता, बंधुता आणि खरी स्वतंत्रता टिकू शकते. सनातन धर्माची मूळ अधिक बळकट करण्यासाठी आणि भारताच्या सुंदर, समृद्ध भविष्यासाठी हा महोत्सव एक सुवर्णसंधी आहे. या महामंथनातून मिळणाऱ्या तेजाने भारत गगनभरारी घेईल आणि सनातन धर्माचा दिव्य प्रकाश संपूर्ण जगात पसरेल. म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन या दिव्य कार्यात सहभागी होऊया आणि भारताला त्याच्या सनातन तेजाने पुन्हा उभे करूया, असेही आवाहन त्यांनी शेवटी केले आहे.

## महाराष्ट्र दिनी महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा पुरस्काराने गौरव



**◆ कल्याण (प्रतिनिधी) :**

महावितरणच्या कल्याण परिमंडल कार्यालयात महाराष्ट्र दिनी कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. जागतिक कामगार दिनानिमित्त वर्षभरात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ५० उत्कृष्ट तांत्रिक कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले.

सन २०२४-२५ या वर्षात उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले. सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी तांत्रिक कर्मचारी हे महावितरणच्या प्रगतीचे शिल्पकार असल्याचे नमूद करत स्वतःला सिद्ध करण्याची क्षमता कायम जोपासण्याचे आवाहन त्यांनी कर्मचाऱ्यांना केले. अधिक जोमाने काम करून नवनवीन यशोशिखरे पादाक्रांत करण्याबाबत त्यांनी कर्मचाऱ्यांना शुभेच्छाही दिल्या. यावेळी अधीक्षक अभियंता दीपक पाटील, महेश अचिंनमाने, मोहन काळोगे, सहायक महाव्यवस्थापक सुशिल पावसकर, कार्यकारी अभियंता नितीन काळे, मिलींद चौधरी, सुनील वनमोरे, पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांसह अभियंते, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता स्मीता काळे यांनी केले, तर वरिष्ठ व्यवसापक निलेश भवर यांनी आभार मानले.

**पुरस्कार प्राप्त कर्मचारी**

कल्याण मंडल एक-पूजा मोहरे, संतोष नवले, दत्तू भवारी, विठ्ठल भिवटे, सुनील बोडके, मुकेश पाटील, तारासिंग पवार, बापू चौरे, सुधीर सोनावळे, जगदीश ढमके, विलास भोईर, शेषपाल चव्हाण, योगेश गायगोळे.

**कल्याण मंडल दोन**-प्रल्हाद म्हात्रे, अरुण इसामे, राजेंद्र पाटील, सुनील खोजे, अमीत सोनकुसरे, ज्ञानेश्वर फोडसे, कृष्णा गाडे, सचिन घागस, दीनेश मोहपे, प्रितीलाल पांडव, विजय लोखंडे, योगेश चिमटे, तुलशीदास पाटील, दत्तू केंगळा, कान्या गावीत, शेखर दहातोंडे.

**वसई मंडल**-विवेक म्हात्रे, रवींद्र पारधी, विष्णू कळंगे, सुनिल गायकवाड, अशोक मराठे, सचिन चौगले, उमेश पाटील, राहुल घरत, कृष्णा साळी, मिलींद जाधव, मनोहर महाले, अनिल निकम.

## पालिका उपायुक्तांकडे खंडणीची मागणी

**ठाणे :** महापालिकेच्या उपायुक्त व मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील सक्षम प्राधिकारी मिनल पालांडे यांच्याकडे २५ लाखांच्या खंडणीची मागणी केल्या प्रकरणी एका पत्रकाराविरोधात चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडणीची रक्कम देत नसल्याने पालांडे यांच्या मुलीकडे बघण्याची धमकीही त्याने दिली. या प्रकरणी पोलीस त्याचा शोध घेत आहेत. सुहास शिंदे असे खंडणीचा गुन्हा दाखल झालेल्या पत्रकाराचे नाव असून त्याचे कार्यालय तीन हात नाका येथे आहे. पाचपाखडी भागात राहणाऱ्या मिनल पालांडे या ठाणे पालिकेत उपायुक्त पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याकडे ठाण्यातील मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील सक्षम प्राधिकारी या पदाचा पदभारही आहे.

## ठाणे जिल्हा परिषदेचे 'सीईओ' राज्यात अव्वल

**◆ ठाणे (प्रतिनिधी):**



मुख्यमंत्र्यांनी हाती घेतलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोयीसुविधा, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर या उपक्रमाचे मुल्यमापन करण्यात आले होते. त्यामध्ये घुगे यांनी आपल्या कामगिरीतून १०० पैकी ९२ टक्के गुण प्राप्त करत अव्वल स्थान पटकावले आहे.


देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे मुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम हाती घेतली. सर्व कार्यालये पारदर्शक, ऑनलाईन, नागरिकांच्या तक्रारीचे तत्काळ निवारण, झिरो पेन्डेन्सी आदी कार्यक्रमाचा या मोहिमेत समावेश होता. या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाचे भारतीय गुणवत्ता परिषदेतर्फे अंतिम मूल्यमापन करण्यात आले. १०० दिवसांच्या मुल्यमापनानंतर अखेर गुरुवार १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमाच्या निकालाची घोषणा केली.

यात राज्यातील ५ मंत्रालयीन विभागांचे सचिव, ५ मंत्रालयीन विभागांचे आयुक्त, ५ जिल्हाधिकारी, ५ पोलीस अधीक्षक, ५ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ४ महापालिका आयुक्त, ३ पोलिस आयुक्त, २ विभागीय आयुक्त यांची घोषणा करण्यात आली. यामध्ये सर्वोत्तम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ९२ टक्के गुण मिळवत ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी अग्रस्थान पटकावले आहे.

## कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत २९ महापालिकांची चाचपणी

# उल्हासनगरचे महापालिका आयुक्त राज्यात 'सर्वोत्तम'

**◆ उल्हासनगर (प्रतिनिधी):**




- ●झेंडावंदनानंतर उपस्थितांना तंबाखू मुक्तची शपथ.
- ●शासनाची १०० दिवसांची मोहीम यशस्वीपणे राबविली.
- ●महापालिका समाज मंदिरे व्यवस्थापन प्रणाली ॲपचे उद्‌घाटन.
- ●आमदार आयलानींनी केला पालिका आयुक्तांचा सत्कार.

राज्य सरकारच्या १०० दिवसीय कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम अतंर्गत महाराष्ट्रातील एकूण २९ महानगरपालिकेमधून सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त म्हणून ८६.२९ गुणांसह उल्हासनगर महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावला, तर महाराष्ट्रातील सर्व कार्यालयामधून ८६.२९ गुणासह दुसरा क्रमांक पटकांविल्याची माहिती महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी दिली आहे.

उल्हासनगर महापालिका आयुक्त पदी मनिषा आव्हाळे यांची नियुक्ती झाल्यावर, त्यांनी आपल्या कामाची चुनक दाखविली. शहरातील बेशिस्त कारभाराला आळा घालून स्मार्ट पार्किंग, स्मार्ट रस्ते, ऑनलाईन बांधकाम परवाने, नागरिकांच्या तक्रारीचे निवरण, कचरा मुक्त शहर, कार्यालयाचे संगणीकीकरण, कामाचे वाटप, भंगार साहित्य व गाड्याची विल्हेवाट, अवैध बांधकामावर अंकुश, पार्किंग झोन, संकेत स्थळावर अध्यावत माहिती शासनाच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणेची मोहीम उपक्रम अंतर्गत यशस्वीपणे राबविली. गुरुवारी सकाळी महाराष्ट्र दिनानिमित्त आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या हस्ते महापालिका प्रांगणात झेंडावंदन झाल्यानंतर महापालिकेने पटकाविलेल्या प्रथम क्रमांकाबाबत माहिती दिली.

महापालिका प्रांगणातील झेंडावंदनानंतर आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी उपस्थितांना तंबाखू मुक्त शपथ घेण्यात आली. यावेळी आमदार कुमार आयलानी यांच्या हस्ते महापालिका समाज मंदिरे व्यवस्थापन प्रणाली ॲपचे उदघाटन केले. महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम अतंर्गत सर्वोत्तम महानगरपालिका आयुक्त म्हणून प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे आयुक्त मनिषा आव्हाळे यांचा आमदार कुमार आयलानी यांच्यासह महापालिका अधिकाऱ्यांनी सत्कार करून, आयुक्तांचे तोंड गोड करण्यात आले. महाराष्ट्रातील सर्व कार्यालयामधून ८६.२९ गुणासह महापालिकेने दुसरा क्रमांक पटकवण्यात आल्याची माहिती आयुक्त आव्हाळे यांनी दिली.

**कार्यक्रमास अधिकारी-कर्मचाऱ्यांची लक्षणीय उपस्थिती**

महापालिका कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, उपायुक्त विशाखा मोटघरे, विजय खेडकर, दिपाली चौगुले, अंनत जवादवार, सहायक संचालक व नगररचनाकार ललीत खोब्रागडे, जनसंपर्क अधिकारी अजय साबळे, सहाय्यक आयुक्त मयुरी कदम, सुनील लोंढे, मुख्य लेखाधिकारी किरण भिलारे, शरद देशमुख, गणेश शिंपी, मनिष हिवरे, अलका पवार, सलोनी निवकर, प्राजक्ता कुलकर्णी, विनोद केणे, एकनाथ पवार, यशवंत सगळे, श्रद्धा बाविस्कर, शांताराम चौधरी, राजा बुलानी, अंकुश कदम व इतर अधिकारी उपस्थित होते.

## गुंतवणुकीच्या नावाखाली ग्राहकांना गंडा

**ठाणे :** बडे फिल्मस्टार घेऊन केलेल्या आकर्षक जाहिराती, भरघोस परताव्याचे आमिष आणि झटपट श्रीमंत होण्याची लालसा यामुळे अनेकजण आपली आयुष्यभराची कमाई गमावून बसत आहेत. सध्या मशरूमसारख्या उगवलेल्या अनेक कंपन्यांनी गुंतवणुकीत फसवणूक हा फंडा जोरात बाजारात उतरवला आहे. गुंतवणुकीच्या नावावर स्थापन झालेल्या १० पैकी ६ कंपन्या ग्राहकांना गंडवत असल्याचे धक्कादायक वास्तव गुन्हे अन्वेषण विभागाच्या आकडेवारी वरून स्पष्ट होत आहे. २०२३ या वर्षभरात राज्यात तब्बल पन्नास हजारांहून अधिक गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याची आकडेवारी गुन्हे अन्वेषण विभागाच्या वेबसाईटवर आढळून येते.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचा शुभारंभ

**◆ ठाणे (प्रतिनिधी) :**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तळमजल्यावर सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी सीईओ रोहन घुगे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, प्र. उपजिल्हाधिकारी (सर्वसाधारण) सचिन चौधर, तहसिलदार (महसूल) रेवण लेंभे, तहसीलदार उमेश पाटील, प्रदीप कुडाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे व मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष' सुरू करण्यात यावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. या कक्षाचे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पालकमंत्री / मंत्री/ राज्यमंत्री यांच्या हस्ते राज्यात उद्‌घाटन करण्यात आले. या कक्षाचे प्रमुख म्हणून रामेश्वर नाईक हे जबाबदारी सांभाळीत आहेत.

गरजू रुग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरवली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यासंदर्भात २२ फेब्रुवारी रोजी शासन निर्णय काढण्यात आला.

## मनपा रुग्णालयात डायलिसिस सेवा सुरू

**भाईंदर :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून मीरा-भाईंदर महापालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी डायलिसिस युनिटचे लोकार्पण करून रुग्णांसाठी डायलिसिस सेवा सुरू केली. मेकिंग ऑफ डिफरन्स या सेवाभावी संस्थेमार्फत पराग पारीख फायनान्शिअल ॲडव्हायझरी सर्व्हिसेस यांच्या सहकार्याने रुग्णालयाला ५ डायलिसिस मशिन्स भेट देण्यात आल्या आहेत. पूर्वी कार्यरत असलेल्या युनिटमध्ये ८ डायलिसिस मशिन्स असून त्या द्वारे अनेक रुग्ण नियमितपणे उपचार घेत आहेत. आता त्यात नव्याने ५ मशिन्सच्या समावेश झाल्याने गरजू रुग्णांना आणखी जलद आणि सुलभरित्या उपचार मिळतील. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी ही सेवा म्हणजे एक मोठा दिलासा ठरणार आहे.

## मुरबाड तालुक्यात 'महाराष्ट्र दिन' उत्साहात साजरा !

**◆ मुरबाड (प्रतिनिधी) :**

### स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांचा कार्यक्रमात सत्कार



मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात व मुरबाड शहरी परिसरात तसेच सर्व सरकारी कार्यालयामध्ये महाराष्ट्र राज्याचा ६५ वा वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला.

मुरबाड तहसील कार्यालयाच्या प्रांगणात मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमात स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांचा सत्कार करण्यात आला. मुरबाड तहसील कार्यालतील कर्मचारी तातू ठाकरे हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांचाही सत्कार आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते करण्यात आला. मुरबाड पोलिसांच्या वतीने झेंड्याला मानवंदना देण्यात आली

आमदार कथोरे यांनी यावेळी सांगितले की, आजच्या दिवशी मुरबाड शहरासह तालुक्यातील सर्व कामगारांची नोंदणी करण्याचे महत्वाचे काम करण्याचे आवाहन कामगार दिनी केले असून त्याचा लाभ कामगारांना मिळणार आहे. माळशेज घाटातील बहुचर्चित काचेचा स्काय वॉकला वित्त विभागाची मंजुरी मिळाली असल्याने मुरबाडचे नाव जगाच्या पटलावर झळकणार आहे. समृद्धी महामार्ग, वडोदरा एक्स्प्रेस,कल्याण-माळशेज हायवे यांच्यामुळे मुरबाडचे दळणवळण वाढणार असून भविष्यात तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी नवीन एम.आय.डी.सी लवकरच आणण्याचे प्रयत्न चालू आहेत

यावेळी मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख, मुरबाड नगरपंचायत मुख्य अधिकारी मनोज म्हसे, नायब तहसीलदार अमोल शिंदे, निवासी नायब तहसीलदार सुषमा बांगर, पंचायत समिती बांधकाम विभाग उपअभियंता संजय कोरडे, पाणीपुरवठा उप अभियंता जगदीश बनकरी, मुरबाड पोलीस अधिकारी, राजकीय, सामाजिक, शालेय विद्यार्थी, महसूलचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुरबाड पंचायत समितीच्या प्रांगणात मुरबाड गट विकास अधिकारी डॉ. लता गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुरबाड पोलीस ठाण्याच्या प्रांगणात मुरबाड पोलीस उपविभागीय अधिकारी जगदीश शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुरबाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांच्यासह अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. मुरबाड नगरपंचायतीच्या प्रांगणात नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. यावेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मनोज म्हसे तसेच सर्व नगरसेविका, नगरसेवक उपस्थित होते.

### गटार सफाई मजूर मिळत नसल्याने कसारा, खर्डी भागातील तरुणांना मागणी

# केडीएमसीत गटार सफाईची कामे करणाऱ्या मजुरांच्या जीवाला धोका

**◆ कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत पावसाळ्यापूर्वीची नाले, गटार सफाईची कामे सुरू करण्यात आली आहेत. गटार सफाईची कामे करताना मजूर ठेकेदाराने दिलेले संरक्षित साहित्य न वापरता गटार सफाईची कामे जीव धोक्यात घालून करत आहेत. नागरिक या प्रकाराविषयी आश्चर्य व्यक्त करत आहेत.

गटार सफाईची कामे करताना मजुरांनी हातमोजे, गमबुट, डोक्यावर शिरस्त्राण, चेहऱ्यावर संरक्षित पट्टी, कमरेला दोर बांधणे बंधनकारक आहे; परंतु अनेक मजूर गटार सफाईची कामे करताना संरक्षित साधनांचा वापर न करता गटारात उतरून गटार सफाईची कामे करत आहेत. गटारात विषारी वायू तयार झालेले असतात.

गाळ आणि त्या गाळामध्ये विविध प्रकारचे जीवजंतू असतात. या सर्व घटकांचा मजुरांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. गटारात उतरल्यानंतर गाळाने भरलेला हात अनेक वेळा मजूर आपल्या चेहऱ्याला लावतात. गटार साफ करताना या मजुरांना काही बाधा झाली की मग ठेकेदार आणि महानगरपालिकेची यंत्रणा खडबडून जागी होती.

यासंदर्भात ठेकेदार आणि जल, मलनिस्सारण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले, गटार सफाई करणाऱ्या मजुरांना सर्व प्रकारची संरक्षित साधने ठेकेदाराने दिली आहेत. त्यांनी त्या साधनांचा वापर करावा, अशा सक्त सूचना आहेत. पालिका प्रशासनाने ठेकेदाराला मजूर कामगारांची काळजी घेऊनच ही कामे करावीत अशा सूचना केल्या आहेत. मजूर कामगारांनी सांगितले, हातमोजे, गमबुटाचा वापर करून आम्ही गटारात उतरलो, तर गमबुटात गटारातील पाणी जाऊन पायांना, पायांच्या बोटांमध्ये चिखल्या (जखमा) होतात. हातमोजे घातले की काम कामाचा उरक करताना अडचणी येतात. हातमोजे गटारातील पाणी, गाळाने सारखे भरून जातात. काम करताना अडथळे येतात. गतीने काम करण्यासाठी आम्ही या साधनांचा वापर करत नाहीत. गटार सफाईची कामे करताना आम्ही काळजी घेतो.




**चांगल्या रोजगाराच्या आश्वासनावरच मजूर उपलब्ध**

यापूर्वी डोंबिवलीतील नाक्यावर गटार सफाई कामासाठी सहजपणे ठेकेदाराला मजूर उपलब्ध होत होते. आता विविध शासकीय योजना, खासगी आस्थापनांमध्ये तरुणांना नोकऱ्या मिळत आहेत. त्यामुळे पूर्वीसारखा तरुण आणि ४० ते ५० वयोगटातील नागरिक गटार सफाई कामासाठी मिळत नाहीत. या मजुरांना वाढीव मजुरी देण्याचे आश्वासन देऊनही ते कामावर येण्यास तयार होत नाहीत, अशी माहिती काही कामगार ठेकेदारांनी दिली. ही कामे करण्यासाठी आदिवासी दुर्गम भागातील कसारा, खर्डी, शहापूर भागात जावे लागते. तेथील तरुणांना चांगल्या रोजगाराचे आश्वासन दिल्यावर ती गटार सफाईची कामे करण्यासाठी मिळतात, असे ठेकेदारांनी सांगितले.


> गटार सफाईची कामे करणाऱ्या मजुरांना ठेकेदारांनी सर्व प्रकारचे संरक्षित साधने दिली आहेत. ही साधने वापरून गटार सफाई करताना मजुरांना अडचणी येतात म्हणून ते साधने वापरत नाहीत. ही साधने वापरूनच गटार सफाई करावी, अशा सूचना ठेकेदारांना केल्या आहेत.
>
> **- घनश्याम नवांगुळ**, कार्यकारी अभियंता

## महाराष्ट्र दिनी केडीएमसीत वाजली राज्यगीताची ध्वनीफीत

**◆ कल्याण (प्रतिनिधी):**

महाराष्ट्र राज्याचा ६६ व्या स्थापना दिनी कल्याण डोंबिवली महापालिका मुख्यालयात आयुक्त अभिनव गोयल यांनी ध्वजवंदन केले. यावेळी राष्ट्रगीत गायन झाल्यावर शासन निर्णयानुसार राज्यगीताची ध्वनीफीत वाजवण्यात आली.

महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी आहे, त्यांचा आदर्श आपण पुढे ठेवला पाहिजे. या वर्षी संविधानाचा अमृत महोत्सव आपण साजरा करीत आहोत. संविधानाच्या मूल्ये, आदर्श प्रत्येक नागरिकाने जतन करायला हवे. ही मूल्ये आपल्या मधे रुजवायला हवीत आणि आपला महाराष्ट्र, भारत देश प्रगतिपथावर जाईल यासाठी, राज्याच्या, देशाच्या विकासाठी प्रत्येक नागरिकाने हातभार लावावा असे आवाहन करीत आयुक्त अभिनव गोयल यांनी सर्व उपस्थितांना तसेच नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



या वेळी केंद्र शासनाच्या 'पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजने'चा प्रसार व प्रचार करण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या माहिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. सौर ऊर्जा ही हरित ऊर्जा असल्याने जास्तीत जास्त नागरिकांनी तिचा वापर करावा, या दृष्टिकोनातून जनजागृती करण्याच्या आनुषंगाने हे माहितीपत्रक तयार करून त्याचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

महापालिकेच्या डोंबिवली विभागातही अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या हस्ते आज ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी उपायक्त रमेश मिसाळ, सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर, राजेश सावंत, उप अभियंता अजय महाजन, महेश गुप्ते तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. दत्तनगर, डोंबिवली (पूर्व) येथील १५० फुटी ध्वजाचे ध्वजवंदन आज महापालिकेच्या शहर अभियंता अनिता परदेशी यांच्या हस्ते करण्यात आले.

# जातनिहाय जनगणना : केंद्राचा क्रांतिकारी निर्णय

जातनिहाय जनगणना करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने घेतलेला दुरगामी परिणाम करणारा निर्णय म्हणावा लागेल. १९३१ नंतर प्रथमच अशी जनगणना होणार असल्याने हा क्रांतिकारक निर्णय मानला जातो. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने विशेषतः उत्तर प्रदेश, बिहार या 'काऊ बेल्ट' हिंदी पट्ट्यात जातनिहाय जनगणना करण्याचा मुद्दा उचलून, सत्ताधारी एनडीए सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या प्रयत्नाला फारसे यश मिळाले नाही. तरीही, समाजातील एक उपेक्षित वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांची गणना होणे गरजेचे आहे, ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे आता विरोधकांची बोलती बंद झाली आहे. खरं तर काँग्रेसने त्यांच्या सत्ताकाळात हा निर्णय घेण्याची हिंमत दाखवली नव्हती. काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेचा विरोध केला आहे. त्यामुळेच, १९४७ पासून देशात जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. जात जनगणना करण्याऐवजी जात सर्वेक्षण करण्यात आले. त्यामुळे राहुल गांधींना यावर टीका करण्याचा अधिकार पोहोचत नाही; परंतु समाजातील विशिष्ट समूहांना आपल्याकडे ओढण्यासाठी राहुल गांधी यांच्या काँग्रेस पक्षाने जातनिहाय जनगणनेचा मुद्दा गेल्या काही महिन्यांत उचलून धरला होता. 'दुसऱ्यास शिकवतो ज्ञान, आपण मात्र कोरडे पाषाण' या म्हणी प्रमाणे राहुल गांधींच्या काँग्रेसची अवस्था आहे. 'जिसकी जितनी संख्या, उसकी उतनी भागीदारी होगी,' असे प्रचार सभेतून बोलणाऱ्या राहुल गांधी यांनी दलित, आदिवासी, ओबीसी वर्गातील किती टक्के पदाधिकाऱ्यांना पक्षाची महत्त्वाची पदे दिली, हे जाहीर करावे. त्यामुळे मोदी सरकारने उचलेल्या या भूमिकेमुळे विरोधकांच्या हातातील मुद्दा निकामी झाला आहे.

दर दहा वर्षांनी जनगणना कार्यक्रम केला जातो. २०११ नंतर जनगणना झाली होती. त्यामुळे जनगणनेत यंदा जातनिहाय गणना समाविष्ट करण्यात आली आहे. देशातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय अशा विविध घटकांचे प्रमाण किती याची निश्चित आकडेवारी समजण्यासाठी ही जातनिहाय जनगणना उपयुक्त ठरणार आहे. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये असलेल्या आरक्षणाचे प्रमाण लोकसंख्येच्या तुलनेत कमी असल्याच्या नेहमीच्या तक्रारी आहेत. निश्चित आकडेवारी उपलब्ध नसल्याने प्रत्येक समाज घटकांची प्रत्यक्ष लोकसंख्या किती याची अधिकृतपणे आकडेवारी सरकारकडे उपलब्ध नसल्याने जातनिहाय जनगणनेची मागणी पुढे आली होती.

इंद्रा सहानी विरुद्ध भारत सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणासाठी ५० टक्क्यांची मर्यादा घातली होती. बहुतेक राज्यांनी ही मर्यादा ओलांडली. ५० टक्क्यांची ही मर्यादा शिथिल करावी, अशी मागणी सर्वच राजकीय पक्षांकडून केली गेली. जातनिहाय जनगणनेची आकडेवारी प्रसिद्ध झाल्यावर लोकसंख्येच्या आधारे ही मर्यादा शिथिल करणे शक्य होईल, असे राजकीय नेत्यांना वाटते आहे. तसे पाहायला गेले, तर २०११च्या जनगणनेबरोबरच जातनिहाय जनगणना करावी, अशी विविध राजकीय पक्षांनी मागणी केली होती. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने सामाजिक-आर्थिक जातनिहाय जनगणना केली होती. मात्र, ही गणना जनगणना कायद्यानुसार झाली नव्हती. या जनगणनेची अधिकृत आकडेवारी तांत्रिक चुकांचे कारण देत केव्हाच प्रसिद्ध करण्यात आली नाही. सामाजिक-आर्थिक जनणगनेत ४६ लाख ७३ हजारांच्या आसपास विविध जाती, उपजाती असल्याची आकडेवारी जमा झाली होती. पण यामध्ये सुमारे आठ कोटी चुका झाल्या होत्या. कोरोना काळामुळे २०२१ मध्ये जनगणना झाली नव्हती.

कर्नाटक सरकारने २०१५ मध्ये जातनिहाय जनगणना केली होती. त्यानंतर बिहार, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांनी जातनिहाय जनगणना केली होती. विविध राज्यांनी जातनिहाय जनगणना केली तेव्हा दरवेळी केंद्र सरकारने राज्यांच्या जातनिहाय जनगणनेला विरोध केला होता. विशेष म्हणजे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात जातनिहाय जनगणनेच्या विरोधात भूमिका मांडली होती. जनगणना करण्याचा अधिकार हा फक्त केंद्र सरकारचा आहे, राज्यांना स्वतंत्रपणे जनगणना करता येत नाही, असा युक्तीवाद केंद्र सरकारने न्यायालयात मांडला होता. आता केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेतल्यामुळे, अनेक राज्यात जातीच्या आरक्षणामुळे निर्माण झालेले प्रश्न निकाली लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, त्यासाठी केंद्र सरकारला एकूण ५० टक्के आरक्षणाची अट शिथिल करून ती वाढवावी लागणार आहे.

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २४६ नुसार, जनगणना ही सातव्या अनुसूचीतील संघ सूचीमध्ये ६९ व्या स्थानावर सूचीबद्ध असलेला केंद्र सरकारच्या अधिकारक्षेत्रातील विषय आहे. काही राज्यांनी जातींची गणना करण्यासाठी सर्वेक्षणे केली असली, तरी या सर्वेक्षणांमध्ये पारदर्शकता आणि हेतूमध्ये भिन्नता आहे, काही सर्वेक्षणे केवळ राजकीय दृष्टिकोनातून केली गेली आहेत, ज्यामुळे समाजात शंका निर्माण झाल्या आहेत. या सर्व परिस्थितींचा विचार करून आणि आपल्या सामाजिक रचनेवर राजकीय दबाव येऊ नये, यासाठी जातनिहाय गणना स्वतंत्र सर्वेक्षण म्हणून करण्याऐवजी मुख्य जनगणनेतच समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे सर्व समाजघटकांना त्यांचा न्याय्य हक्क मिळण्यास मदत होणार आहे. सामाजिकदृष्ट्या दुर्बल, वंचित, उपेक्षित समाजबांधवांच्या विकासासाठी सरकारला अधिक निधी देता येईल. मागास समाजघटकांचा शैक्षणिक, आर्थिकस्तर उंचावण्यास मदत होऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे ध्येय वेगाने साध्य करता येईल. जातनिहाय जनगणनेचा निर्णय म्हणजे सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने टाकलेले महत्त्वपूर्ण, क्रांतीकारी पाऊल म्हणावे लागेल.


# काश्मीर : एक अनुभव...

पहलगाम येथे आम्ही पोहोचलो तेंव्हा सर्व घोडेवाले जमा झाले विविध पॉइंट दाखवण्याचे कबूल करण्यात आले. वाढवून चढे दर सांगून थोडी तडजोड करण्यात आली. प्रत्येक पर्यटकांना वेगळे दर, गम बूटचे वेगळे दर, फोटो काढणारे त्यांचे वेगळे दर, तिथे पण वेगवेगळे दर. प्रचंड निगोशिएशन, ही प्रत्येकाची कला. घोडे बरेच चिखलाने माखलेले ... पण लांबूनच काही पॉइंट दाखवण्यात आले व प्रत्यक्ष काही पॉइंट. प्रत्येक वेळी निघण्याची घाई करण्यात आली. माझ्या मुलीने निवडलेला घोडेवाला लगट करत होता. उतरल्यावर प्रत्येक घोडेवाला टीप मागतो. घोड्याकरिता चणे मागतो. फोटोवाला टीप मागतो. हे मुद्दाम सांगू इच्छितो की, घोडा हाकण्याच्या निमित्ताने तो असे करत होता. त्यांचे बोलणे अत्यंत उद्धट होते. घोडा घेताना एक भाषा व प्रत्यक्ष दुसरी भाषा. इतर व्हॅली जाण्यासाठी लोकल युनियनचीच गाडी करावी लागते. तिथे ही निगोशियेट करावे लागते. कोणतेच दर निश्चित नाहीत. अरू व्हॅली येथे, तर मॅगी शंभर रुपये, स्वीट कॉर्न शंभर रुपये.

सोनमर्ग... येथे गेल्यावर तिथे पण हीच परिस्थिती. प्रचंड निगोशिएशन. त्यांची भाषा अजिबात कळत नाही. सांगितलेले पॉइंटमधील फिशपॉइंट. येथे एक ही मासा नाही फक्त तळे आहे. अनेक पॉइंटवर बर्फ नाही पण ते कल्पनाही देत नाहीत. पूर्ण भ्रमनिरास... बरेच पॉइंट लांबून दाखवले जातात. इथे पण मॅगी शंभर रुपये, बटर मॅगी एकशे वीस रुपये. आपल्याला ते एक एटीएम समजतात. शिकारा राईड निगोशिएशन... परत टीप मागतात. फोटो निगोशिएशन त्यावर टीप मागणे आलेच.

शालिमार गार्डन... काश्मिरी वेषभूषा करताना पण लगट... फोटो काढणे निगोशिएशन. फोटो सॉफ्ट कॉपी घेणे, ठरलेले पैसे देऊन सुद्धा टीपची मागणी. आपण जातो ते आनंदाकरता आणि त्यांना त्या निमित्ताने रोजगार मिळेल या उद्देशाने... पण ते तसे आपल्याकडे पाहात नाहीत. फक्त लूट.

ज्या दिवशी फायरिंग झाले त्याच्या आदल्या दिवशी आम्ही त्या स्पॉटला होतो. दुसऱ्या दिवशी श्रीनगर येथे होतो. दुसऱ्या(त्या) दिवशी काश्मीर बंदची हाक दिली होती. बरीच दुकाने बंद, हॉटेल बंद आपण तिथे अनोळखी... अशा परिस्थितीत आम्ही आमच्या हॉटेलला दुपारचे जेवण सांगितले. त्याने डाळ भात देण्याचे कबूल केले. बिल प्रत्येकी दोनशे पन्नास रुपये फक्त. माझा



जम्मू-काश्मीरमध्ये मी व माझे कुटुंबीय गेलो होतो तेव्हाचे माझे अनुभव, आपण सर्व जण आनंदाकरिता जातो. तेव्हा आलेला हा पहिला अनुभव...

**दिलीप कुलकर्णी**

नातू सोबत होता वय पाच वर्षे, त्याचे पण तितकेच पैसे. कोणतीही माणुसकी मला तर दिसली नाही. पाण्याच्या बाटल्या देतानाचा एक व्हीडिओ टाकला म्हणजे संपूर्ण काश्मिरातील माणूसकी नव्हे. या परिस्थितीत आम्ही टेन्शनमध्ये होतो( असे तिथे अनेक जण पण असतील). सर्व जण चला परत असे म्हणत होते. मग आम्ही एक क्लिप तयार करून पोस्ट केली. टॅग करून लोकशाही चॅनेलला पाठवली. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बोलणे करून दिले. त्यावर त्वरित एकनाथ शिंदे यांच्या स्वीय सहायक अभिजित दरेकर यांचा फोन आला. त्यांनी काळजी करू नका आम्ही आहोत असे म्हणाले. मागोमाग मुरलीधर मोहोळ यांच्या स्वीय सहायक यांचा पण फोन आला. त्यांनी पण अजिबात काळजी करू नये, आम्ही सर्व व्यवस्था करत आहोत असे सांगितले आणि सर्वांची नावे आणि आधार क्रमांक मागितला. ती यादी आम्ही पाठवली. आता आम्हास खूप धीर आला. दुपारी अभिजीत दरेकर आम्हास हॉटेलवर भेटण्यास आले, त्यांनी पण सर्वांची नावे आणि आधार क्रमांक मागितला. आता सर्व स्तरावर पर्यटक परत आणण्यास प्रयत्न सुरू झाल्याचे समजल्यावर खूप बरे वाटले. संध्याकाळी सात वाजता अभिजित दरेकर यांनी फोन करून बॅग भरून विमानतळावर येण्याची सूचना दिली. त्याप्रमाणे आम्ही त्वरित बॅग भरून घेऊन विमानतळावर आलो. दरम्यान, मुरलीधर मोहोळ यांच्या स्वीय सहायक यांनी एक यादी फेस बुकवर प्रसिद्ध केली त्यात आमच्यातील अकरापैकी आठ जणांची नावे दिसली. त्यावेळेस आम्ही श्रीनगर विमानतळावर होतो. त्यावर आम्ही मुरलीधर मोहोळ यांच्या स्वीय सहायक यांना आम्ही विमानतळावर आहोत असे सांगितले आणि एकनाथ शिंदे हे आम्हास घेण्यास येणार असल्याचे सांगितले. दहा वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले. त्यांना बघून सर्वांच्या डोळ्यांत अश्रू आले. त्यांनी आम्हास विमानात बसवून मुंबईस पाठवले. अशा वेळी आम्हास सर्वोतोपरी मदत करणारे, मुरलीधर मोहोळ आणि त्यांचे सर्व सहकारी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अभिजीत दरेकर साहेब आणि आमचे मुंबई येथे सहर्ष स्वागत करणारे कुर्ला येथील आमदार मंगेश कुडाळकर, अंधेरी येथील आमदार मुरजी पटेल, विजय सांगळे आणि शिवसेना (शिंदे गट) यांचे असंख्य कार्यकर्ते यांचे मनःपूर्वक आभार मानतो आणि त्यांना खूप खूप धन्यवाद देतो यांच्या संयुक्त प्रयत्नाने आम्ही सुखरूप घरी पोहोचलो.

**माझ्या मनातील काही प्रश्न...**

१)त्यावेळी तेथे घोडेवाले, फोटोग्राफर, जे रील करण्यात तरबेज होते, छोटे-मोठे स्टॉलवाले, यांची संख्या असंख्य होती, तर याचे फोटो अथवा व्हीडिओ चित्रण कोणीच कसे केले नाही ,

२) अशा भयावह परिस्थितीत, प्रोग्राम प्रिपोंड करून तीन दिवस आधी निघाल्यावर पण हॉटेलवाल्याने त्या तीन दिवसांचे पण पैसे घेतले, ही कसली माणुसकी(त्यांना विनंती करून पण), तुम्ही आधी जाताय यात आमचा काय दोष असे म्हणणारे ते...

३) याच प्रमाणे ठेवलेला टेम्पो ट्रॅव्हलर यांनी पण वाहन न वापरता सुद्धा तीन दिवसांचे पैसे घेतले. वाहन तुमच्या करिता होते, तुम्ही वापरले नाही आम्ही काय करू...

४) काश्मीर बंद असताना, पर्यटक घाबरले असताना, डाळ भात खाण्यासाठी दोनशे पन्नास रुपये लावणारा हॉटेलवाला, यांच्याकडून ही माणूसकी आम्हास बघण्यास मिळाली.

माणूसकीच्या नुसत्याच गप्पा, तुमच्यामुळे आमचे कुटुंब चालते असे म्हणून, मगरीचे अश्रू ढाळणारे हे आणि आपली माणसे संकटात असताना प्रत्यक्ष येऊन घरी परत आणणारे, फोन करून आधार देणारे, लगेच येण्याची सोय करणारे.. यांच्यात जमीन-आस्मानाचा फरक आहे. तेव्हा या तयारीनिशी आपण तिकडे जावे किंवा कसे ते आपण ठरवावे ही नम्र विनंती.

# अर्थसंकल्पातील आयकर सुधारणा

अर्थसंकल्प हा एक आकडेवारीचा खेळ आहे. वर्षानुवर्षे यात तरतुदी केल्या जातात त्यांचे कोणतेही मूल्यमापन केले जात नाही. काही खर्च अनेक पटीने वाढतात, तर काही उपयोगातच आणले जात नाहीत. वाढणारे कर्ज आणि त्यासाठी करावी लागणारी तरतूद यामध्ये बराचसा भाग खर्ची पडतो. त्यामुळे कितीही ठरवले तरी अनेक उत्पादक गोष्टींवर खर्च करण्याला आपोआपच मर्यादा येतात. आयकर रचनेतील सुधारणा हा मुद्दा अधोरेखित करण्याचा प्रयत्न आहे. फार पूर्वी आपण आर्थिक उदारीकरणाचा स्वीकार केला आणि त्यामुळे आपल्या जीवनविषयक संकल्पना बदलून गेल्या. काही चैनीचं गरजेत रूपांतर कधी झालं ते कळलंच नाही. अपेक्षित रोजगार निर्मिती झाली नाही. अनेक वस्तू आणि सेवा कंत्राटी पद्धतीने केल्या गेल्याने त्या कमी उत्पादन खर्चात मिळू लागल्या. संघटित उद्योगांनी सरकारी धोरणे आपल्या अनुकूल बदलली तर लोक कल्याणाचा वसा घेतलेल्या शासनाने गरिबांना अधिकाधिक मोफत सोयी सवलती देण्यात धन्यता मानली. अनेक जणांनी मिळेल ते काम करून आपला जीवनक्रम स्वीकारला. यात अनेक पारंपरिक विचारांना तिलांजली दिली.



आयकर कायद्यात आमूलाग्र सुधारणा करण्याचा सरकारचा विचार असून त्याचाच भाग म्हणून करमोजणी करण्याची नवीन पद्धत सरकारने आणली. ही पद्धती कर वाचवण्यासाठी काही खर्च अथवा गुंतवणूक न करता कमी दराने कर आकारणी करते तर जुनी करमोजणी पद्धत अधिकाधिक कर सवलती देऊन राहिलेल्या उत्पन्नावर अधिक दराने कर आकारणी करते. नवी पद्धत अधिकाधिक लोकांना कशी रुचेल आणि तीच पद्धत बहुसंख्य लोकांनी स्वीकारली तर कर कायदा बदलणे अधिक सोपे होईल हे सरकारने ओळखले आहे. गेल्या वर्षी ७२% विवरणपत्रे या पद्धतीचा स्वीकार करून भरली गेली.



**उदय पिंगळे**
मुंबई ग्राहक पंचायत

येत्या काही महिन्यात आयकर कायदा पूर्णपणे बदलणारे (ज्याला सरकार कर कायदा सुलभ करणारे म्हणते) विधेयक सरकार मंजूर करून घेणार आहे. यापुढे अधिक सवलती या नव्या पद्धतीने करमोजणी स्वीकारण्यास तयार असलेल्यांना देण्यात येतील. तूर्तास जुन्या पद्धतीने करमोजणी कोणत्याही बदलां शिवाय तशीच चालू राहील. यातील सवलतींचा लाभ घेऊन कर मोजणी करणाऱ्यांपैकी फारच थोड्या लोकांना त्याचा आयकारात लाभ मिळू शकेल त्यामुळे येत्या एक दोन वर्षात ही पद्धती मोडीत निघून कागदावरच अस्तित्वात राहील.

या अर्थसंकल्पात नव्या कररचनेनुसार मोजणी करणाऱ्यांना त्यांच्या करपात्र उत्पन्नावर ४ लाखांपर्यंत कोणताही कर नाही. त्यावर ८ लाखांपर्यंत उत्पन्न असेल, तर ५% दराने त्यावरील १२ लाखांपर्यंत उत्पन्नावर १०% दराने अश्या प्रत्येक ४ लाखांच्या टप्प्यावर ५% अधिक कर द्यावा लागेल जो २४ लाखांवरील उत्पन्नावर ३०% असेल. ज्याचे करपात्र उत्पन्न १२ लाख रुपयांच्या आत आहे त्यांना करसूट ( सेक्शन ८७ ए) दिल्याने कोणताही कर भरावा लागणार नाही. यावरील अधिक उत्पन्नाची आकारणी चार लाख वरील उत्पन्नावर दिलेल्या कर दराने केली जाईल साहजिकच या वर्गातील बहुतेक लोकांकडे कोणतीही गुंतवणूक कर वाचवण्यासाठी न करता अधिक खेळता पैसा उपलब्ध राहील. या पैशांतून त्यांनी अधिक बचत आणि खर्च करावा, असे सरकार म्हणत असले तरी बचतीस प्रोत्साहन देणारी कोणतीही योजना नसल्याने यातील बहुतेक रक्कम शिल्लक न राहता खर्च होणार आहे आणि त्यामुळे मागणी वाढून अर्थव्यवस्थेवरील मरगळ झटकली जाईल अशी अपेक्षा आहे. या बारा लाख उत्पन्नावर करमाफी देण्यातही एक मेख आहे. एकूण उत्पन्नांची मोजणी करताना त्यात विशेष दराने कर आकारणी केले जाणारे उत्पन्न म्हणजेच अल्पकालीन आणि दीर्घकालीन भांडवली नफा त्यात मिळवले जाईल आणि एकूण उत्पन्न मोजले जाईल ते उत्पन्न चार लाखाच्या आत असेल आणि अन्य कोणतेही उत्पन्न नसेल तर त्यावर कर आकारणी केली जाणार नाही. त्याचप्रमाणे बारा लाखांहून किंचित जास्त उत्पन्न असलेल्या व्यक्तीला त्याच्या देय कराऐवजी अधिकच्या उत्पन्नाएवढाच कर भरण्याची सवलत मिळते त्यास सीमांत सवलत (मार्जिनल रिलीफ) म्हणतात ती मिळेल. टीसीएस आणि टीडीएस मर्यादेत भरीव वाढ करण्यात आली आहे. यामुळे एकूण करदात्यांच्या पर्यायाने विवरणपत्र दाखल करणाऱ्याच्या संख्येत लक्षणीय घट होईल. अर्थमंत्रांनी अशी कररचना करून अनपेक्षितपणे मोठी उदारता दाखवली असली तरी, शून्य करमर्यादेत ३ लाखांवरून ४ लाखांपर्यंत आणि कर टप्प्यातील बदल ३-६-९ वरून ४-८-१२ हे महागाईच्या तुलनेत अनुरूप आहेत. प्रमाणित वजावटीत कोणताही बदल केलेला नाही. या पूर्वी दिलेल्या अल्प सोयी सवलतीत कोणतीही वाढ नाही.

सध्या ज्या प्रमाणे झालेला बदल खूप मोठा करून दाखवला जात आहे, त्याचा फायदा घेऊन सध्यातरी अजून अधिकचे काही मिळण्याची शक्यता कमी वाटते. या बदलांना खूप मोठे समजून "क्रांतिकारक बदल" असे म्हणता येणार नाही. महागाई वाढ जाणून घेऊन पूर्वी असलेल्या सोयी काही मर्यादेत विशिष्ट वर्गास प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पुन्हा देण्यात आल्या आहेत. असे असले तरी १२ लाखांच्या आत उत्पन्न असणाऱ्या मोठ्या पगारदार गटाला (याला आता अधिकृत मध्यमवर्गीय आपण म्हणू शकतो) आणि अनेक सेवानिवृत्त लोकांना या रचनेने बराचसा दिलासा मिळेल. आपल्या आजूबाजूला अनेक छोटे-मोठे व्यवसाय करणाऱ्या लोकांना कर नाही, पण आपण नोकरी करतो, पेन्शन आहे किंवा व्याज मिळवतो म्हणून आपले उत्पन्न दिसून येते आणि त्यावर कर द्यावा लागतो त्यामुळे केवळ आमचीच पिळवणूक होते ही त्यांची भावना कमी होण्यास मदत होईल. भांडवल बाजार सध्या खाली येऊन एका मर्यादेत स्थिरस्थावर होण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याने यावर सकारात्मक परिणाम दाखवला नसला तरी भविष्यात मागणीत होणाऱ्या वाढीचा कंपन्यांच्या नफ्यावर आणि नफ्यातील वाढीचा बाजारभावावर निश्चित परिणाम होऊ शकेल. जोडीला ट्रम्प यांचे व्यापार धोरण आणि त्यामुळे रुपयांचे झपाट्याने होणारे अवमूल्यन यांचाही प्रभाव पडेल. यातील काही गोष्टी चिंता वाढवणाऱ्या असल्या तरी चिंताजनक नसाव्यात.

mgpshikshan@gmail.com

## राशिभविष्य
शुक्रवार, ०२ मे २०२५

**|| पंचांग ||**

आज मिती वैशाख शुद्ध पंचमी शके १९४७ . चंद्र नक्षत्र आर्द्रा. योग धृती १३.०३ पर्यंत, चंद्र राशी मिथुन,भारतीय सौर १२ वैशाख शके १९४७ म्हणजेच शुक्रवार दिनांक २ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.१०, मुंबईचा सूर्यास्त १९.०१, मुंबईचाचंद्रोदय १०.११ , मुंबईचा चंद्रास्त ००.४०, राहू काळ १०.५९ ते १२.३५, श्री रामानुजाचार्य जयंती, श्री आद्य शंकराचार्य जयंती, शुभ दिवस.

**|| भविष्य ||**

**मेष** : आनंदी दिवस राहील.

**वृषभ** : सहकार्याची अपेक्षा ठेवू नका.

**मिथुन** : आर्थिक लाभ होतील.

**कर्क** : कामे वेगाने पूर्ण होतील.

**सिंह** : निर्णय धाडसाने घ्यावे लागतील.

**कन्या** : प्रयत्न जास्ती करावे लागतील.

**तूळ** : नियोजन सफल होताना दिसेल

**वृश्चिक** : प्रतिष्ठेमध्ये वाढ होईल.

**धनू** : शुभ दिवस.

**मकर** : प्रयत्न केल्यास सफलता मिळेल.

**कुंभ** : मुलांकडून चांगल्या बातम्या कानावर येतील.

**मीन** : आर्थिक आवक वाढेल.

### जातनिहाय जनगणनेचा निर्णय स्वागतार्ह

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यांच्या सरकारने पुढच्या सार्वत्रिक जनगणनेत जातनिहाय जनगणना करण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला. जातीय जनगणनेचा विषय आरक्षणाशी जोडला गेल्याने विविध राजकीय पक्षांनी वेळोवेळी मागणी लावून धरली. ती मोदी सरकारने मान्य केली. आता २०२५ मध्ये सुरू होईल. याचा अर्थ जनगणनेचे चक्र आता बदलणार आहे. सर्व काही व्यवस्थित झाले तर पुढची जनगणना २०३५ मध्ये होईल. यावेळी जनगणना होणारी जनगणना व्यापक स्वरूपाची असल्याने ती पूर्ण होण्यास जवळपास दोन वर्षे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे २०२६,मध्ये आकडेवारी समोर येईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ मध्ये पहिली जनगणना केली. तेव्हा केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या आधारे वर्गीकरण करण्यात आले होते. त्यानंतर दर दहा वर्षांनी जनगणना होत होती. प्रत्येक जनगणनेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीची माहिती स्वतंत्रपणे दिली जाते; परंतु इतर मागासवर्गीयांची आकडेवारी दिली जात नाही. त्यामुळे मागासवर्गीयांची नेमकी लोकसंख्या किती आहे, याची आकडेवारी मिळत नाही. मंडल आयोगाने इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्याची शिफारस केली होती; परंतु त्याला तीव्र विरोध झाला होता. जातनिहाय जनगणना करण्याची मागणी सामाजिक आहे, तशीच ती राजकीय आहे. निवडणुकांमधील आरक्षण हे सगळे जनगणना महितीवरच आधारित असते. विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असा जातनिहाय जनगणनेचा निर्णय आहे. तसेच कारण काहीही असले तरी विरोधकांची एक दीर्घकालीन मागणी मोदी सरकारला मान्य करावी लागली.

– **सुनील कुवरे,** शिवडी (मुंबई)

### सुरक्षित नसल्याची भीती

जनसंवाद

२०२४ मध्ये भारताचा संरक्षणावरील खर्च पाकिस्तानच्या संरक्षण खर्चापेक्षा ९ पट अधिक होता, असा अहवाल स्टॉकहोम आंतरराष्ट्रीय शांतता संशोधन संस्थेने दिला आहे. भारताचा लष्करी खर्च जगात तिसऱ्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर गेला आहे. पाकिस्तान आणि चीन या दोन्ही शेजारी देशांबरोबर भारताचे संबंध तणावपूर्ण असणे हे भाराताचा संरक्षणावरील खर्च वाढण्याचे कारण आहे. पण जागतिक तणाव, युद्धजन्य स्थिती आणि राजकीय अस्थिरतेमुळे जगातील सर्वच देशांनी संरक्षणावर जास्त खर्च करू लागले आहेत. तसेच सातत्याने संरक्षण खर्चात वाढ करीत आम्ही शक्तिशाली आहोत हे दाखवण्याची स्पर्धा लागली आहे. आता कोणताच देश संरक्षणावरील खर्च कमी करण्याच्या विचारात नाही. हल्ली शेजारी देशांशी सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी या ताकदीचा उपयोग होत आहे. देशासमोरील संरक्षणाच्या आव्हानाचा विचार करत मोठ्या देशांच्या संरक्षण खर्चात वाढ होणे चिंताजनक आहे. जगात कोठेही युद्धाची शक्यता नाकारता येत नाही. जगातील पर्यावरणाच्या ऱ्हासाला हाच संरक्षणावरील खर्च कारणीभूत ठरणार आहे.

– **विवेक तवटे** , कळवा, ठाणे

### ... त्यांना आधी स्वत:च्या मरणाने मरू द्यावे

पहलगाम प्रकरणानंतर पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याबाबत देशप्रेमी जनतेकडून केंद्र सरकारवर दबाव वाढत आहे आणि ते स्वाभाविकही आहे. मात्र भारताने पाकिस्तानला आधी स्वतःच्या मरणाने मरू द्यावे. तिथे आता स्वतंत्र बलुचिस्तानच्या मागणीने नव्याने जोर धरला आहे. स्वतंत्र पख्तुनिस्तानची मागणीदेखील ७५ पेक्षा जास्त वर्षांइतकी जुनी आहे. तिसरी 'जिये सिंध' ही चळवळदेखील तितकीच जुनी असून सध्या सिंधमधील जनता पाकिस्तानातील (पश्चिम) पंजाब्यांच्या विरोधात रस्त्यांवर उतरली आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्येदेखील जुलमी राजवटीच्या विरोधात बंडाळ्या होतच असतात. तेव्हा पाकिस्तानची शकले होऊन ते स्वतःच्या मरणाने मरणारच आहे. त्यानंतर भारताने शेवटचा घाव घालावा. पाकिस्तानातील असंतुष्ट जनतेचे लक्ष इतरत्र वळविण्यासाठी पाकिस्तानी राज्यकर्ते जेव्हा भारताशी पंगा घेण्याचे दुःसाहस करतील, तेव्हाच त्यांचे कंबरडे मोडणे आवश्यक आहे. त्याआधी सिंधू पाणीकरारास स्थगिती, पाकिस्तानी नागरिकांना त्वरित भारत सोडून देण्याचे आदेश, इत्यादीबाबतची कारवाई होतच आहे. पाकिस्तानची आर्थिक आणि व्यापारविषयक, औषधविषयक कोंडी करण्यात येत आहेच. भारतात आता जी जनजागृती वाढली आहे, त्या वातावरणात देशातील पाकिस्तानबद्दल पुळका असलेले फेक्युलर पुरोगामी, हिंदू नावे धारण करणारे छुपे देशद्रोही, पाकिस्तानची भाषा बोलणारे विरोधी नेते, देशभरात पसरलेले अस्तनीतले निखारे... या सर्वांची गठडी वळणे आवश्यक आहे. बाह्यशत्रूंचा बंदोबस्त होईलच, पण देशांतर्गत देशद्रोही शक्तींचा बीमोड ह्या निमित्ताने करणे आवश्यक आहे. पाकिस्तान स्वतःच्या मरणाने मरणारच आहे.

– **अविनाश वाघ,** पुणे

### असा माणूस गुन्हेगार असू शकतो का?

'दाभोळकर हत्या आणि मी' या विक्रम भावे लिखित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला जाण्याचा योग आला. पुस्तकाचे लेखक विक्रम भावे यांनी केलेला संघर्ष त्यांच्या तोंडून ऐकताना अंगावर शहारे आले. रोज १११ सूर्यनमस्कार घालून सूर्यदेवतेची आराधना करणारा, गुरुचरित्राची पारायणे करणारा, साधना करणारा माणूस केवळ हिंदू म्हणून त्याच्यावर ही वेळ आली का ? आयुष्यातील महत्त्वाची पाच वर्षे बंदीवासात घालवावी लागली. हे नुकसान कसे भरून काढणार? ते कारागृहात असताना त्यांची पत्नी आणि मुलगी यांनी समाजाला कसे तोंड दिले असेल? याचा विचार करताना प्रत्येकाने स्वतःला त्यांच्या जागी ठेवून बघावे. अधिकाऱ्यांनी त्यांना त्यांच्या हिंदुत्वनिष्ठ जोडीदाराविरुद्ध खोटी साक्ष दिली तर आम्ही तुम्हाला अटक करणार नाही, असे सांगितल्यावर त्यांनी न डगमगता अधिकाऱ्याला उत्तर दिले, मला अटक झाली तरी चालेल, पण माझ्या हिंदुत्वनिष्ठ जोडीदाराविरुद्ध मी खोटी साक्ष देणार नाही. असा माणूस गुन्हेगार असू शकतो का?

– **संजय पंडित,** सातारा.

### वृत्तवाहिन्यांनी वृत्तांकनाचा अतिरेक थांबवावा

पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यानंतर भारत आणि पाकीस्तान मधील संबंध तणावपूर्ण झाले आहेत. भारताने या हल्ल्याचा चोख बदला घ्यावा आणि पाकीस्तानला कायमस्वरूपी धडा शिकवावा अशी सर्व भारतीयांची मनापासून इछा आहे.सरकार, त्या दृष्टीने पावले देखील उचलत आहे. पण वृत्तवाहिन्यांनी जरा संयम दाखवणे गरजेचे आहे. जणू पुढल्या क्षणी युद्ध चालू होणार असून त्याची पक्की बातमी फक्त आपल्या वाहिनीकडेच आहे असा पवित्रा सर्व वाहिन्यांच्या वृत्तनिवेदकांचा आहे. सतत पाकीस्तान किती घाबरला आहे , भारत कशा प्रकारे हल्ला करू शकतो? भारत आणि पाकीस्तानची सैनिकी ताकद किती आहे? भारताने काय केले की पाकीस्तान त्यावर काय करू शकतो? अशा चर्चासत्रांचे पेव फुटले आहे. जे घडले आहे केवळ ते सांगणे हे वृत्तनिवेदकांचे काम आहे हेच सध्याच्या वाहिन्या विसरलेल्या आहेत. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने एवढ्या गंभीर विषयाची सूत्रे कारवाईच्या आधीच सर्वांना चर्चेसाठी बाहेर येतील या भ्रमात राहून वृत्तवाहिन्यांनी प्रेक्षकांना मूर्ख बनवणे थांबवावे. गेल्या दहा वर्षांत मोदी सरकारची कार्यपद्धत आणि त्यांच्याकडून पाळल्या जाणार्या गुप्ततेची जाणीव जरी वृत्तवाहिन्यांना नसली तरी सर्वसामान्य जनतेला ती आहे.

– **अनिकेत शेटे,** पुणे

### खेळात सातत्य ठेवावे...

क्रिकेटच्या क्षितिजावर उगवता तारा म्हणून ओळख प्राप्त झालेल्या वैभव सूर्यवंशी या १४ वर्षीय पोरसवदा खेळाडूने गुजरात टायटन्स विरुद्ध केवळ ३८ चेंडूत ठोकलेले झंझावते शतक केवळ अवर्णनीय! त्यातील ९४ धावा षटकार आणि चौकारांनी वसूल करणाऱ्या आक्रमकतेची त्याची पूर्व तयारी आपल्या प्रशिक्षकाला आत्मविश्वासाने सांगताना उद्याच्या प्रकाशगर्भ उषःकालाची खात्री देणारी होती. आयपीएल कारकिर्दीची सुरुवात षटकाराने करणारा सूर्यवंशी भारतीय क्रिकेटचे वैभव असेल यात शंका नाही. अती प्रसिद्धी, प्रसार माध्यमांचे डोक्यावर घेणे, क्रिकेट पासून विचलित करणाऱ्या जाहिरातींचा मोह त्याने टाळण्यातच त्याचे भले आहे. अन्यथा त्याचा विनोद कांबळी किंवा पृथ्वी साव होण्यास वेळ लागणार नाही ही शक्यता क्रिकेट मंडळाने देखील ध्यानात घेऊन त्याची सर्वोतोपारी काळजी घ्यावी!

– **हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर

## पालकमंत्र्यांच्या हस्ते 'कंपोस्ट खड्डा भरू, गाव स्वच्छ ठेवू' अभियानाचा शुभारंभ



◆ **पालघर (प्रतिनिधी):**

राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या आदेशानुसार पालघर जिल्ह्यात "कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू!" हे विशेष स्वच्छता अभियान सुरू झाले असून, या अभियानाचा शुभारंभ कोळगाव येथे पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते पार पडला. ओला व सुका कचरा कंपोस्ट खड्ड्यामध्ये टाकून पालकमंत्री तसेच इतर मान्यवरांनी या अभियानाचा शुभारंभ केला.

खासदार डॉ. हेमंत सवरा, जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, निवासी जिल्हाधिकारी, सुभाष बागडे, प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, कोळगाव सरपंच कुणाल चंद्रकांत पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इजाज अहमद शरीख मसलत, पाणी व स्वच्छता विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारसकर, गट विकास अधिकारी बापूराव नाळे, उपसरपंच किरण संखे, सदस्य योगेश पाटील, दिलीप कोळेकर, नैनीता पाटील, मेघुल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

# मुद्रांक शुल्क विभागाची यंदा उद्दिष्टापेक्षा अधिक कमाई

## दस्त नोंदणीच्या माध्यमातून ५८ कोटींचा महसूल

◆ **रत्नागिरी (प्रतिनिधी):**

सर्वांत जास्त महसूल देणाऱ्या नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाने यंदा उद्दिष्टापेक्षाही अधिक महसूल मिळवला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षांचे उद्दिष्ट ५५ कोटींएवढे होते. दस्त नोंदणीच्या माध्यमातून या विभागाने उद्दिष्टापेक्षाही जास्त ५८ कोटी २९ लाख एवढा महसूल मिळवला. यामध्ये ८ हजार ७५३ एवढ्या दस्तांची म्हणजे खरेदी-विक्रीची नोंद झाली आहे. सुमारे ११० टक्के या विभागाने उद्दिष्ट पूर्ण केले आहे.

येथील नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षांसाठी ५५ कोटींचे उद्दिष्ट आले होते. वर्षभरात विविध प्रकारचे ८ हजार ७५३ दस्तांची म्हणजे खरेदी-विक्रीची नोंद होऊन त्या द्वारे या विभागाला ५८ कोटी २९ लाख एवढा महसूल मिळवला आहे. म्हणजे या विभागाने यावेळी ११० टक्के उद्दिष्टपूर्ती केली आहे. यामध्ये जमीन, जागा, ब्लॉक, खरेदी-विक्री, कुळमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र आदींचा यामध्ये समावेश आहे.

नोंदणी व मुद्रांक विभाग
महाराष्ट्र शासन

आतापर्यंतची दस्तनोंदणीची पद्धत वर्षानुवर्षे दस्ताचा मजकूर तयार करून त्याची प्रिंट काढण्यात येते. दस्ताला लागणाऱ्या मुद्रांक शुल्काचे चलन काढून ते भरण्यात येते. दस्तासाठी आवश्यक अकृषक दाखला (एनए), सातबारा, प्रॉपर्टी कार्ड, आधारकार्डसारखे विविध कागदपत्रे, प्रतिज्ञापत्रेही जोडली जातात. वकिलामार्फत दुय्यम निबंधक कार्यालयांत प्रत्यक्षात दस्ताची नोंदणी करण्यात येते. त्यासाठी सुमारे अर्धा तास लागतो.

दस्तनोंदणीसाठी सध्या दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये टोकन पद्धती अस्तित्वात आहे. दिलेल्या टोकनच्या वेळेनुसार, दस्त नोंदणी करण्यासाठी पक्षकार, वकील कार्यालयात येतात. त्यानंतर प्रक्रिया पूर्ण होते.

### 'आय सरिता २.०' या संगणक प्रणाली

पारंपरिक दस्तनोंदणीची पद्धत आता कालबाह्य होणार आहे. नव्याने बदल होणाऱ्या 'आय सरिता २.०' या संगणक प्रणालीमुळे दस्तनोंदणी अगदी सोपी होणार आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञानकेंद्राच्या मदतीने ही संगणकप्रणाली तयार करण्यात येत आहे. नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाच्या संकेतस्थळावर आता नवी 'विंडो' खुली होणार आहे.

## भूमी अभिलेख विभागाकडून कामाचा निपटारा

# आदिवासींचा सामुदायिक वस्तीने राहण्याचा प्रश्न मार्गी




◆ **शहापूर (प्रतिनिधी) :**

आदिम वस्तीच्या २६ प्रकरणात तब्बल दोन हजार ३०० एकर जमिनीच्या मोजणीचा अवघ्या दोन दिवसात निपटारा करून आदिवासींच्या सामुदायिक वस्तीने राहण्याचा प्रश्न भूमी अभिलेख विभागाने मार्गी लावला आहे. मुख्यमंत्री शंभर दिवसाचा आराखडा या उपक्रमाचा शहापूर तालुक्यातील तब्बल तीन हजार आदिवासी बांधवांना लाभ मिळणार असून भूमी अभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक बाबासाहेब रेडकर यांच्या या विशेष नियोजनबद्ध कामगिरीमुळे आदिवासी बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.

भूमी अभिलेख विभागाचे जिल्हा अधीक्षक बाबासाहेब रेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक शरद काळे व परिरक्षण भूमापक व्यंकटेश आगलावे यांनी मुख्यमंत्री शंभर दिवसांचा आराखडा या उपक्रमांतर्गत नियोजनबद्ध कारभारामुळे नागरिकांची कामे सुलभ केली आहेत. यांच्या तालुक्यातील जमीन मोजणीची लटकलेली डिसेंबर अखेरची तब्बल २०० प्रकरणे निकाली काढली असून मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत मोजणीची ४०० प्रकरणे निकाली काढणार असल्याचे भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक शरद काळे यांनी सांगितले.

शहापूरच्या भूमी अभिलेख विभागांतर्गत सर्व्हे व गट नंबरचे गटबुक नकाशे, भूसंपादन, पोटहिस्सा, बिनशेती, फाळणी आदी प्रकारचे नकाशे यांसह विविध अभिलेखांचे स्कॅनिंग व डिजिटाईज करून तपासणीचे काम युद्धपातळीवर सुरू असून त्याचा लाभ येथील शेतकऱ्यांना मिळणार आहे. तालुक्यात चावडी वाचनाचे विविध ठिकाणी विशेष शिबीरांचे आयोजन करून नागरिकांना पब्लिक डाटा एन्ट्री व सर्व प्रकारचे भूमी अभिलेख उपलब्ध करून देण्यात आल्याचे परिरक्षण भूमापक व्यंकटेश आगलावे यांनी सांगितले.

विशेष म्हणजे उदासीन व अस्ताव्यस्त असलेल्या शहापूरच्या भूमी अभिलेख कार्यालयातील बैठक व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, दर्शनी भागात लावलेली झाडे या लक्ष वेधून घेणाऱ्या सुशोभीकरणामुळे येथील नक्षा बदलल्याने नागरिकांची सोय झाली असून नाविन्यपूर्ण केलेल्या सुधारणांचे कौतुक केले जात आहे. तर कार्यालयीन मोजणी अर्ज भरणे, नगर भूमापन कंदील नावे लावणे व इतर कामकाजाची प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन झाल्याने नागरिकांसाठी सुलभ झाले असून त्यांना कामांसाठी फेऱ्या मारण्याची गरज राहिली नसल्याने त्यांना दिलासा मिळाला आहे.

## वेचक

### कासार्डेत सत्यनारायण महापूजेनिमित्त विविध कार्यक्रम

**कणकवली :** कासार्डे, धुमाळवाडी ग्रामस्थ व मुंबई मंडळ आयोजित प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी श्री इसवटी महापुरुष देवालय, कासार्डे(धुमाळवाडी)ता.कणकवली याठिकाणी शनिवार, १०मे २०२५ रोजी श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे. त्यानिमित्त शनिवार दि.१० मे २०२५ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सकाळी ८ ते १० वा. श्री गांगेश्वर मंदिरात अभिषेक होणार असून त्यानंतर पुन्हा सकाळी १०.३० ते १ वा. श्री सत्यनारायण महापूजा होणार आहे. दुपारी १.३० ते ३.३० वा.महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे आणि सायंकाळी ४ ते ६.वा.वाडीतील महिलांचे व मुलांचे विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर रात्री ८ वा.स्थानिक भजन होणार आहे. शेवटी रात्री १० नंतर निमंत्रित वारकरी भजने आयोजित करण्यात आली असून,(श्री गांगेश्वर प्रासा.भजन मंडळ, गडमठ(वरचा आवाट)-बुवा श्री.विलास सुतार),(श्री कुलस्वामिनी प्रासा. भजन मंडळ. नागसावंतवाडी-बुवा श्री.अतुल सावंत), (श्री गणेशकृपा प्रासा.भजन मंडळ, पियाळी-वंजारेवाडी,बुवा श्री.संदेश वंजारे), (प्रासा.भजन मंडळ दक्षिण गांवठण(शेट्ये आवाट)-बुवा श्री.प्रमोद शेट्ये), श्री इसवटेश्वर प्रासा. भजन मंडळ, दाबवाडी- बुवा श्री.अशोक पांचाळ) इत्यादी भजने होणार आहेत. तरी या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थ, कासार्डे, धुमाळवाडी/मुंबई यांनी केले आहे.

### ईश्वरी सुवरे इंग्रजी प्रायमरी परीक्षेत राज्यात तिसरी

**संगमेश्वर :** तालुक्यातील बुरंबी पंचक्रोशी शिक्षण संस्थेच्या दादासाहेब सरफरे विद्यालय बुरंबी प्रशालेची इयत्ता ६ वी मधील विद्यार्थिनी ईश्वरी सुनील सुवरे हिने भारती विद्यापीठ पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या इंग्रजी प्रायमरी बहिस्थ परीक्षेत राज्यात तिसरा क्रमांक पटकाविला. बुरंबी शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी शरद बाईत यांनी बोलताना संस्था विद्यार्थ्यांसाठी विविध सहशालेय उपक्रमांसाठी प्रोत्साहित करीत आहे. क्रमिक अभ्यासक्रम हा सक्तीचा भाग आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांबरोबरच त्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देण्यासाठी संस्था नेहमीच प्रेरणा देत आहे. या शाळेतील अनन्या डोळस ही विद्यार्थिनी सुद्धा यापूर्वी गणित विषयात राज्यात प्रथम आली आहे. ईश्वरी सुवरे हिचे यश संस्था व शाळेसाठी नक्कीच अभिमानास्पद आहे, असे सांगितले. मार्गदर्शक शिक्षक प्राचार्य प्रकाश वीरकर, राकेश बांद्रे, स्वरा शिंदे व यशस्वी विद्यार्थिनी ईश्वरी सुवरे हिचे संस्थेचे पदाधिकारी राजाराम गर्दे, शांताराम भुरवणे यांचेसह सर्व संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### कंटेनरची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**खेड :** मुंबई-गोवा महामार्गावरील लवेल नजीक कंटेनरने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीवरील दोघे जखमी झाले. ही घटना २९ एप्रिल रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडली. अंकुश गणपत चाळके, वय ६७ वर्षे व अर्चना अंकुश चाळके, वय ६० वर्षे, रा. पिरलोटे विठ्ठलवाडी असे जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. तर या प्रकरणी राजन श्रीराम चाळके, वय ४५, रा. पीर लोटे विठ्ठलवाडी यांनी तक्रार दाखल केली आहे. यातील अंकुश गणपत चाळके व अर्चना अंकुश चाळके हे त्यांच्या मालकीच्या टीव्हीएस ज्युपीटर क्र.एम.एच.०८ ए.डब्ल्यु ५७९६ या गाडीवरुन पिरलोटे विठ्ठलवाडी ते खेड असे मुंबई-गोवा महामार्गावरून जात असताना समोरुन रॉंग साईटने येणारा माल वाहतूक १४ टायर ट्रक क्र. एम.एच.१५ एच.एच.७५८७ वरिल चालक सागर विठ्ठल पठाडे, वय २९ वर्षे, रा.सोमठाजोष, ता. येवला, जि.नाशिक याने ठोकर देत अपघात केला. याअपघातामध्ये अंकुश चाळके यांचे डोक्याला, छातीला, डाव्या पायाला व जिभेला, जबड्याला दुखापत झाली, तर अर्चना यांच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर होऊन गंभीर दुखापत झाली, म्हणून कंटेनर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### खेड रेल्वे स्थानकावर मंगळसूत्र चोरीला

**खेड :** येथील रेल्वे स्थानकावर आलेल्या गाडीमध्ये शिरत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने विवाहितेचे १ लाख ३५ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र चोरले. ही घटना २५ एप्रिल रोजी सायंकाळी ५.१५ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी रोशनी बाळाराम गुरव, वय ४३, मूळ गाव कोचरी लांजा, सध्या रा. मालाड पूर्व यांनी येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यातील तक्रारदार यांनी त्यांच्या पर्समध्ये मंगळसूत्र ठेवले होते. मात्र त्या पर्स घेऊन ट्रेनमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने पर्सची चेन खोलून मंगळसूत्र चोरून नेले.

### जयस्तंभ येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी चोरीला

**रत्नागिरी :** रत्नागिरी शहर पोलीस स्थानकाच्या हद्दीतील नगर परिषदेच्या वाचनालयासमोर जयस्तंभ येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी शहर पोलीस स्थानकात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयूर आनंद विलणकर (वय २८, खडपेवठार) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांनी रत्नागिरी नगर परिषदेच्या वाचनालयासमोर हिरव्या रंगाची यामाहा उभी करून ठेवली होती. ती अज्ञात चोरट्याने बुधवारी चोरून नेली. याप्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात भारतीय न्यायसंहिता अधिनियम २०२३ चे कलम ३०३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### एकामागोमाग एक अनधिकृत खोक्यांची उभारणी

**खेड :** खेड नगर परिषद हद्दीतील मोक्याच्या शासकीय जागा हेरुन त्याठिकाणी अनधिकृतपणे खोके उभारण्याचा सपाटा अद्यापही थांबलेला नाही. तरीही नगर प्रशासन अतिक्रमण विरोधातील कारवाईबाबत अजूनही सुस्तच आहे. यासाठी आठ महिन्यापूर्वी स्थापन करण्यात आलेली समितीही कागदावरचं राहिली आहे. यामुळे अनधिकृत खोक्यांवर नगर प्रशासनाकडून कारवाईची शक्यता धूसर बनली आहे. नगर प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता खोके उभारण्याचा प्रकार सुरू असल्याने शहर अनधिकृत खोक्यांचे माहेरघर बनले आहे. नगर परिषद हद्दीत अनधिकृत खोके उभे करत दुकानेही थाटली आहेत. नगर प्रशासनाने ८ महिन्यापूर्वी अनधिकृत खोक्यांवर कारवाईसाठी समिती नेमली होती. कायदेशीर बाबींच्या पूर्ततेचे कामही सुरू केल्याचे मुख्याधिकाऱ्यांनी स्पष्ट केले होते.

## गव्हाण ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

◆ **गव्हाण (प्रतिनिधी):**

ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र दिनाचा उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित ध्वजारोहण समारंभ ग्रामपंचायत प्रशासक महेश घबाडी यांच्या हस्ते संपन्न झाला. यानंतर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेमध्ये गव्हाण गावाच्या विकासाला चालना देण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तब्बल २५ लाख आणि प्राथमिक आरोग्य केंद्राला ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले.

ग्रामसभेमध्ये ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामांवर चर्चा झाली. यात उलवे नोड प्लॉट क्रमांक ६, सेक्टर १२ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर क्रीडांगणाचे सुशोभीकरण आणि विकासकामांचा सखोल आढावा घेण्यात आला.



क्रीडांगणाची संरक्षण भिंत सिडकोच्या माध्यमातून बांधून घेण्यासाठी आवश्यक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यासोबतच, उलवे नोड सेक्टर १२, प्लॉट क्रमांक ७ मधील बागेच्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला आणि उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत चर्चा झाली. गावातील पाणीपुरवठ्याच्या महत्त्वाच्या विषयावरही सविस्तर मंथन झाले. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सिडको अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठक आयोजित करण्याचा निर्णय ग्रामसभेत घेण्यात आला. या ग्रामसभेला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, भाऊशेठ पाटील, माजी सरपंच वसंत म्हात्रे, माजी उपसरपंच विजय घरत, विश्वनाथ कोळी, वामन म्हात्रे, योगिता भगत, माई भोईर, जिज्ञासा कोळी, सचिन घरत यांच्यासह ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## आवडीच्या नंबरसाठी ग्राहकांनी मोजले लाखो रुपये

**रत्नागिरी :** रत्नागिरी जिल्ह्यातील विविध वाहनांसाठी आवडीचा नंबर घेण्याकडे नागरिकांचा कल वळू लागला असून हौशेला मोल नसते हे मात्र खरे याच आवडीच्या नंबरपासून अडीच लाखांपासून तीन हजारांपर्यंत पैसे मोजले आहेत. त्याचा फायदा आरटीओला झाला असून आरटीओच्या तिजोरीत लाखो रुपयांचे गंगाजळ पडले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात विविध नवीन वाहने खरेदी करताना आपल्या गाडीला भाग्याचा किंवा आपल्या आवडीचा नंबर असावा यासाठी अनेकजण इच्छुक असतात. व्हीआयपी नंबरसहीत काही विशिष्ट नंबर आपल्या कुटुंबाला आपल्या व्यवसायाला लाभदायक असल्याने तेच नंबर मिळावेत म्हणून किंबहुना त्याच नंबरच्या गाडीत बसणारे अनेकजण असतात. यासाठी आरटीओला विशिष्ट नंबर मागणी करताना त्यासाठी अगदी ३ हजार रुपयांपासून अडीच लाखांपर्यंत पैसे देणारेही कमी नाहीत. रत्नागिरी जिल्ह्यात ८५३ वाहन चालकांनी पसंतीच्या क्रमांकासाठी हे पैसे मोजले असून उप्रादेशिक परिवहन विभागाच्या तिजोरीत ९६ लाख २६ हजार रुपयांची भर पडली आहे.

## कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठानकडून हुतात्म्यांना आदरांजली



◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र घडविण्यासाठी दिल्लीच्या तख्ताला घाम फोडणाऱ्या १०६ हुतात्म्यांना कोकण विभाग म्हादे परिवार संलग्न कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाणच्या वतीने महाराष्ट्र दिनी अभिवादन करण्यात आले. दरम्यान, शहीद सीताराम गणपत म्हादे यांनाही यावेळी आदरांजली वाहण्यात आली.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मिती झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ जणांनी होतात्म्य पत्करले. या हुतात्म्यांचे स्मरण या दिवशी केले जाते. सिताराम गणपत म्हादे हे यावेळी हुतात्मा झाले. कोकण विभाग म्हादे परिवार संलग्न कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाण संघटनेतील ते एक व्यक्तीमत्व होते. दरवर्षी महाराष्ट्र दिनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले जाते.

यंदाही कोकण विभाग म्हादे परिवार संलग्न कोकणस्थ म्हादे प्रतिष्ठाणचे संस्थापक संदीप म्हादे यांच्या नेतृत्वाखाली सरचिटणीस दीपक म्हादये यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन करण्यात आले. मार्गदर्शक तथा पत्रकार काशिनाथ म्हादे, कार्यवाहक सत्यवान म्हादये, उपाध्यक्ष उमेश म्हादे, सदस्य दिलीप म्हादे, सुमित म्हादे, सूर्यकांत म्हादये आदी राजापूर, रत्नागिरी, चिपळूण, संगमेश्वर, खेड, रायगड आदी तालुक्यातील म्हादे बंधू उपस्थित राहून शहीद यांना अभिवादन केले.

## जिल्ह्यातील ८४ लाभार्थी बायोगॅस अनुदानाच्या प्रतीक्षेत

**रत्नागिरी :** शासनाने धूरमुक्त गाव करण्याचा संकल्प केल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यामध्ये बायोगॅसच्या माध्यमातून गोबर गॅसला प्रोत्साहन देण्यात आले. तसेच शासनातर्फे अनुदानही दिले जात असून रत्नागिरी जिल्ह्यातील ८४ लाभार्थ्यांचे बायोगॅस अनुदान अजूनही मिळालेले नाही. ते मिळावे म्हणून वेळोवेळी संबंधित विभागाकडे मागणी केली जात आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात कृषी विभागाच्या माध्यमातून बायोगॅसची निर्मिती केली जाते. याच अनुषंगाने नवीन राष्ट्रीय बायोगॅस कार्यक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यात ११५ लाभार्थी असून त्यातील ८४ लाभार्थ्यांचे पैसे अजूनही मिळालेले नाहीत. लाभार्थ्यांमध्ये खेड तालुक्यात १५, मंडणगड ११, दापोली १६, चिपळूण ११, संगमेश्वर १४, रत्नागिरी १४, लांजा १२, राजापूर १२ असे लाभार्थी असून या लाभार्थ्यांना सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी केंद्र शासनाकडून १४,३५० रुपये मिळतात. तर अनूसूचित जाती जमातींसाठी लाभार्थ्यांना २२ हजार रुपये मिळतात. तसेच शौचालये जोडणी केली तर १,६०० रुपये मिळतात.

## 'वस्तुस्थितीची पाहणी न करताच तयार केलेला शहर विकास आराखडा रद्द करावा'

◆ **लांजा (प्रतिनिधी) :**

टंडन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने वस्तुस्थितीची पाहणी न करता फक्त कागदावरच तयार केलेला लांजा शहराचा प्रारूप विकास आराखडा (डि पी) तातडीने रद्द करावा आणि शासनाने नव्याने एजन्सी नेमून प्रत्यक्ष जागेवर जाऊन विकास आराखडा तयार करावा, अशी मागणी लांजा कुवे नगरपंचायतीमधील नागरिकांनी केली असून याबाबतचे निवेदन पालकमंत्री उदय सामंत यांना सादर केले आहे .

लांजा नगरपंचायतीच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या शहर विकास आराखड्याला लांजा कुवे नगरपंचायत कार्यक्षेत्रातील नागरिकांनी कडाडून विरोध केला आहे. या कृती विकास आराखड्यात अनेक लोकांची घरे, जमिनी, वस्ती बाधित होणार आहेत. आराखड्यात असंख्य त्रुटी असून चुकीच्या पद्धतीने केलेल्या विकास आराखड्यामुळे लांजा नगरपंचायतीच्या हद्दीतील अनेक नागरिकांचे मोठे नुकसान होणार आहे. या पार्श्वभूमीवर लांजा येथे आलेल्या पालकमंत्री उदय सामंत यांना नागरिकांच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, लांजा नगर पंचायतीचा विकास आराखडा तयार करण्यासाठी, शासनाच्या मदतीसाठी टंडन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नेमण्यात आले होती. परंतु नगर रचना विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या कंपनीने प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्वेक्षण न करता विकास आराखडा तयार केल्याने त्यामध्ये असंख्य त्रुटी निर्माण झालेल्या आहेत. त्यांच्या चुकीच्या कामकाजामुळे नागरिकांना भविष्यात आर्थिक नुकसानीसह जागा, जमिनी, घरांचे मोठे नुकसान होणार आहे.

लांजा कुवे शहरामध्ये अनेक वाडी वस्त्या या दाटीवाटीने असून त्यामध्ये दाखविण्यात आलेल्या अंतर्गत रस्त्यांमुळे अनेकांची घरे तुटली जाणार आहेत. रिंग रोडच्या नावाखाली नव्याने काढण्यात आलेला ११ मीटरचा रस्ता बाहेरून येणे गरजेचे होते. परंतु तसे न करता वाड्यावस्त्यांतून नेण्यात आलेला असल्याने यामध्ये घरांचे नुकसान होणार आहे. मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या बाजारपेठेतील अनेक दुकाने व्यावसायिक झोनमधून वगळण्यात आलेली आहेत.

शासकीय विश्रामगृह ते कुवे गावापर्यंत महामार्ग लगतचा भाग ग्रीन झोनमध्ये समावेश केल्याने भविष्यात या भागाची डेव्हलपमेंट थांबणार आहे. रहिवासी भागाच्या शेजारीच नो डेव्हलपमेंट झोन टाकल्याने नागरी वस्तीचे विस्तारीकरण करता येणार नाही. नो डेव्हलपमेंट झोन आणि ग्रीन झोन प्रमाणापेक्षा अधिक टक्केवारीमध्ये टाकण्यात आल्याने भविष्यात शहराचे विस्तारीकरण होण्यासाठी अडचण निर्माण होणार आहे.

शहरातील सर्व इमारतींची प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ ड्रोनद्वारे पाहणी करून नकाशावरती दाखवण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात फुटप्रिंट मोजून दाखवणे आवश्यक होते आणि म्हणूनच प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ कागदावर तयार करण्यात आलेला प्रारूप विकास आराखडा तातडीने रद्द करावा आणि शासनाने नव्याने एजन्सी नेमून आणि प्रत्यक्ष जागेवर जाऊन विकास आराखडा तयार करावा, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# दहशतवादी हल्ल्यावरील स्थानिकांच्या प्रतिक्रिया

पर्यटनाच्या मौसमात काश्मीरमध्ये आकस्मिकपणे केल्या गेलेल्या निघृण हल्ल्याबद्दलच्या परखड प्रतिक्रियाः

**१)निवृत्त नौसेना कमांडर राजन दत्ता (नेव्ही फाऊंडेशन मुंबई, समितीचे माननीय सेक्रेटरी) :** हे वृत्त समजल्यावर आम्ही सारेच संतप्त झालो. आम्ही प्रतिशोध घ्यायला उत्सुक आहोत. नुसत्या वल्गना न करता आमच्याकडून ह्या हल्ल्याला समर्थपणे आणि उघडपणे प्रत्युत्तर दिलं जाईल.

या हल्ल्यात आम्ही आमचा एक उमदा अधिकारी गमावला. हा अधिकारी खरं तर स्वित्झर्लण्ड येथे मधुचंद्रासाठी जाणार होता पण पुरेशी रजा न मिळाल्याने त्याने त्याऐवजी काश्मीरला पसंती दिली. 'पुन्हा कधीतरी स्वित्झर्लण्डला जाऊ' अशी तिची समजूत घालून, तो अगदी थोडक्या दिवसांच्या सुटीवर काश्मीरला आला होता. लगेचच कामावर रुजूही होणार होता. पण तसं व्हायचं नव्हतं! एक अधिकारी कामी आला तर त्याजागी दुसरा येईलही. पण त्याच्या नवपरिणीत पत्नीचं, आईवडिलांचं काय? त्यांची हरपलेली प्रिय व्यक्ती त्यांना कधीच मिळू शकणार नाही.

**२) यासिर शहा (उद्योजक, कश्मीर हॅन्डलूम अँड हॅंडिक्राफ्ट्स) :** ही काळीज हेलावून टाकणारी बातमी कळल्यावर माझ्या तोंडून उद्गार निघाले, "हा अमानुष हल्ला फक्त निष्पाप टूरिस्ट लोकांवर झालेला नसून काश्मिरींच्या अस्मितेवर,त्यांच्या इभ्रती-इज्जतीवर आणि आत्मसन्मानावर झाला आहे!" आणि हे फक्त माझे एकट्याचे मत नसून माझ्या कारखान्यातील सर्व कारागिरांचे व इतरही सहउद्योजकांचेही मत आहे.

अगदी पूर्वापारपासून आम्ही काश्मिरी त्यांच्या मेहेमाननवाझी' बद्दल, आपुलकी आणि मुख्यत्वे 'इन्सानियत' या गुणांसाठी जगभर सुप्रसिद्ध आहोत. पण या दशहवाद्यांनी आम्हाला जगभर बदनाम केलं.



मला आठवतंय की २००२ मध्ये मी मुंबईला आलो. मुंबईने मला फक्त स्वीकारलंच नाही तर अतिशय प्रेमाची वागणूक दिली. मुंबई हेच माझं दुसरं घर बनलं आणि म्हणूनच माझ्या मते या मुंबईच्या लोकांवर झालेला हल्ला म्हणजेच माझ्याच आप्तस्वकीयांवर झालेला हल्ला! या हल्ल्यात आम्ही आमचा एक होनहार बच्चा गमवून बसलो. 'टुरिस्ट लोकांच्या प्राणांची भीक त्याने मागितली.' हाच काय तो त्याचा अपराध होता. सरकारने कठोर पावलं उचलावीत आणि येथला दशहतवाद संपूर्णपणे संपवून टाकावा; अशी मागणी मी माझ्या व इतर काश्मिरी बंधूंच्या वतीनं सरकारकडे करत आहे.

**३) निवृत्त ग्रुप कॅप्टन योगेश पै (डिझास्टर मॅनेजमेण्ट एक्स्पर्ट, एव्हिएटर आणि व्यवसाय मार्गदर्शक):**

पाकिस्तानचे नवे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी बेलगामपणे केलेल्या भाषणाची ध्वनिफीत वा चित्रफीत ज्यांनी ज्यांनी इंटरनेटवर ऐकली-बघितली होती; त्यांना भविष्यात, मिनी युद्ध किंवा सीमेवर हल्ला असलं काही तरी घडू शकेल याचा अंदाज बहुधा आलाच असणार. पण इतक्या लवकर, केवळ सहा दिवसांइतक्याच छोट्या कालावधीत, अमानुष पद्धतीचं भीषण हत्याकांड घडेल; याची कल्पनादेखील कोणी केली नसेल.

भडकवणारी वाक्ये असलेले भडकावू भाषण जनरल साहेबांकडून केलं गेलं होतं. 'पाकिस्तानात ठिय्या देऊन बसलेल्या आणि सध्या काहीशा सुस्त व निष्क्रिय झालेल्या दशहतवाद्यांना सुप्तावस्थेतून पुर्नजागृत करणं.' हाच बहुतेक त्यांचा त्यामागचा उद्देश असावा.

त्यांनतर असंही वाटतंय की, 'भारतात जातीय दंगली घडवून अशांती माजवणे करणे.' असाही त्यांचा छुपा हेतू नक्कीच असावा. थोडक्यात म्हणजेच जनरल मुनीर साहेबांना आपल्या स्फोटक वक्तव्यातून दोन हेतू साध्य करायचे होते. पहिलं म्हणजे दशहतवाद्यांना उचकवायचं होतं तर दुसरं म्हणजे भारतातील सामाजिक परिस्थिती अस्थिर करायची होती. पण 'जनरल साहेबांच्या या असंयुक्तिक अशा वर्तनामागचं संयुक्तिक कारण म्हणजे, आर्थिदृष्ट्या डबघाईला आलेल्या पाकिस्तानचे लष्करप्रमुख आपलं फ्रस्ट्रेशन भारतावर काढू पाहत आहे. दशहतवाद्यांचं माहेरघर म्हणून (कु)प्रसिद्ध असलेल्या त्या देशाला, ते दशहतवादी पोसणे आता जड जाऊ लागलं आहे. 'कलम ३७० रद्द झाल्याने काश्मीरची आता आर्थिक भरभराट होईल. तेथे आता पुन्हा शांतता सुव्यवस्था प्रस्थापित होईल.' हे सत्य पाकिस्तानच्या या लष्कर प्रमुखांच्या(उर्फ नूतन ओसामाच्या) गळ्याखाली मुळी उतरतच नाही.

**शब्दांकन : कल्पिता राजोपाध्ये**

# बातमीची दखल, पण पून्हा बोगसगिरी!

## बोंबला | कनहेरवाडी-मांडवा रस्ता साईड पट्ट्याचे काम निकृष्ट

पुण्यभूमी प्रतिनिधी



कळंब: तालुक्यातील राज्यमार्ग २०९ कन्हेरवाडी पार्टी ते वाशी तालुक्यातील मांडवा या रस्त्याचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सात किलोमीटर डांबरीकरण व सिमेंट रस्ता नुकताच पूर्ण करण्यात आलेला आहे आज तगायतला या रस्त्याचे साईड पट्ट्याचे काम अद्याप केले नव्हते या रस्त्याने किरकोळ अपघात होत होते व वाहनचालकांना ओव्हरटेक व साईड देताना साईड पट्ट्या नसल्याकारणाने वाहन चालकांना वाहन चालवताना कसरत करावी लागत होती.

याकडे ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा निष्काळजीपणा सर्वसामान्य माणसाच्या जिवावर उठत होता तसेच कन्हेरवाडी या गावचे ग्रामदैवत आई सटवाई देवी हे जागृत देवस्थान आहे या देवीच्या दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी या रस्त्याने मंगळवार , शुक्रवार आणि रविवारी वाहनाची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते हा रस्ता तयार झाल्यापासून गुत्तेदार यांनी साईड पट्ट्या का भरल्या नाहीत? आणि सार्वजनिक बांधकाम विभाग गप्प का? हा प्रश्न उपस्थित होत होता याची बातमी दै.पुण्यभूमीने दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध केली होती या बातमीची दखल घेत या रस्त्याचे काम स्नेहस हायडल प्रा.ली कळंब या कंपनीचे ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तात्काळ दखल घेत १४ एप्रिल रोजी या रस्त्याच्या कडेला मुरुमात माती का मातीत मुरुम याचे ढिगारे टाकण्यात आले होते ते ढिगारे साईड पट्ट्याचे खोदकाम न करता माती मिश्रीत मुरुम पसरवण्यात आला आहे व पाणी मारुन दबाई करण्यात आली नाही तरी संबंधित गुत्तेदाराने या साईड पट्ट्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून या बोगस कामाची चौकशी करून गुत्तेदार आणि अधिकाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे काही ग्रामस्थ या साईड पट्ट्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची तक्रार करणार असल्याची माहिती दै.पुण्यभूमी कळंब तालुका प्रतीनीधी रामराजे जगताप यांच्याशी चर्चा केली आहे सध्या भरण्यात आलेल्या साईट पट्ट्यात माती मिश्रित मुरुम असल्यामुळे पावसाळ्यात या साईड पट्ट्या धुवून जाण्याची दाट शक्यता आहे तरी संबंधित गुत्तेदार यांनी साइड पट्ट्याचे निकृष्ट दर्जाचे काम बंद करून चांगल्या प्रकारे साईड पट्ट्याचे काम करुन पाणी मारुन दबाई करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थ व वाहन चालकांमधून होत आहे.

## लोणार मार्गे नवीन बस फेऱ्या

### दिलासा: प्रवाशांना झाली मोठी सोय



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:प्रवाशांच्या सेवेसाठी बुलडाणा विभाग व मेहकर आगार वगळून सातारा,जालना,आणि परभणी विभागाकडून उन्हाळी जादा बसफेऱ्या सुरू करण्यात आले आहे,केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या मागणीनुसार सातारा विभागाअंतर्गत येत असलेल्या मेढा आगाराची मेढा-सातारा-लोणार हि ५४० कि.मी एकेरी प्रवास करणारी एकमेव फेरी सातारा,फलटण, बारामती ,पाटोदा,बीड,गेवराई,अंबड,जालना,नाव्हा,सिंदखेडराजा मार्गे सुरू करण्यात आली आहे,जालना विभागाअंतर्गत येत असलेल्या जालना व परतुर आगाराच्या जालना-लोणार-उमरखेड हि दिवसफेरी सुरू करण्यात आली आहे सदर फेरी जालना येथुन सकाळी ०५:३० वाजता निघून ती नाव्हा,सिंदखेडराजा,लोणार,रिसोड,वाशिम,पुसद मार्गे १२.०० वाजता उमरखेड येथे पोहचते तर उमरखेड येथुन परत १२:३० वाजता जालना करीता सुटते,परतुर आगाराकडुन परतुर-लोणार-नागपुर हि दुसरी फेरी नवीन फेरी सुरू करण्यात पान २ वर

## महात्मा बसवेश्वर समतेचे प्रवर्तक

### राजेश मापारी : लोणार येथे जयंती उत्सव

पुण्यभूमी प्रतिनिधी



लोणार:लोणार तालुका कांग्रेस कमेटी व शहर कांग्रेस कमीटीच्या वतीने आज लोणार शहरात समाज बांधवाकडून माहत्मा बसवेश्वर जंयती मोठ्या उत्साहात शहरातून मिरवणूक काढण्यात येथे ही मिरवणूक विनायक चौक येथे आली असता लोणार तालुका कांग्रेस कमीटीचे तालुका अध्यक्ष राजेश मापारी, शहर कांग्रेस कमीटीचे शहर अध्यक्ष शेख समद शेख अहमद यांनी माहत्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला हार अर्पण केले यावेळी राजेश मापारी यांनी सांगितले की महात्मा बसवेश्वरांनी केलेले समाजसुधारणेची काम जातिभेदाला विरोध

बसवेश्वरांनी वर्णव्यवस्था आणि जातिभेदाला विरोध दर्शवला व त्यांनी सांगितले की, मानव जन्मत: समान आहेत आणि जात किंवा पंथावर आधारित सामाजिक असमानता अन्यायकारक आहे.

महात्मा बसवेश्वर एक महान समाजसुधारक आणि विचारवंत होते. त्यांनी सामाजिक न्यायासाठी आणि समानता स्थापन करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांचे कार्य आजही लोकांना प्रेरणा देत आहे. यावेळी समाज बांधवानी मिरवणूक काढण्यात आली होती ही मिरवणूकी विनायक चौक येथे आल्यावर कांग्रेस कमीटीच्या वतीने हार घालुन अभिवादन केले यावेळी ज्येष्ठ नेते शांतीलाल गुगलीया, मा.नगराध्यक्ष साहेबराव पाटोळे,ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात, माजी नगरसेवक संतोष मापारी, शहर उपाध्यक्ष रामचंद्र पान २ वर

## इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांत प्रवेश

### धोरण:अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड आणि लातूर या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना इयत्ता पहिली मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची सांक्षांकित प्रत असावी, विद्यार्थी दारिद्र रेषेखालील असेल तर त्यासंबंधी छायांकित प्रत व दारिद्र रेषा अनुक्रमांक नमूद करावा. पालकांची उत्पन्न मर्यादा ही १ लाख एवढी असून यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा, वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल. विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निम शासकीय नोकरदार नसावेत, प्रकल्प कार्यालयात प्रवेश अर्ज विनामूल्य उपलब्ध असून दिनांक २३ मे २०२५ पर्यंत परिपूर्ण प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे. तरी या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर पान २ वर

## शिवसंग्रामने फुंकिले रणशिंग

### राजकीय:सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. २ मे रोजी बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करत या सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. यास उदंड प्रतिसाद मिळत असून जिल्ह्यासाठी दिलेले सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेल्या शिवसंग्राम 'संघटन सर्वोपरि ' या विचारधारेने कार्य करणाऱ्या संघटनेत लोकशाही असून सामुहिक निर्णय आणि परस्पर संवाद ही दोन वैशिष्ट्ये आहेत. संघटनशक्तीला बळ देण्यासाठी पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी झोकून देऊन काम करत असल्याबद्दल शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी कौतुक केले. या अभियानासाठी पक्ष संघटना, कार्यकर्ते काम करत आहेत. पुढील महिनाभर हे अभियान राबवणार आहेत. जिल्ह्यात जवळपास ५० हजार सदस्य बनवणार आहेत. या अभियानात युवा, लाडक्या बहिणी, बौध्द समाजात सर्वच समाजाने सहयोग घेतला आहे. असा कोणताही पान २ वर

## जिवाचीवाडीत पाणीप्रश्न गंभीर

### सवाल: ग्रामविकास अधिकारी सतत गैरहजर





पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील जिवाचीवाडी ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी गैरहजर राहिल्याने जिवाचीवाडी अंतर्गत पाणीपुरवठा सुरळीत नाही व ग्राम विकास अधिकारी सातत्याने गैरहजर असल्यामुळे जीवाचीवाडी ग्रामपंचायत अंतर्गत पाणीपुरवठा बऱ्याचशा दिवसापासून खंडित आहे. तरी शासन स्तरावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी तक्रारीद्वारे सुभाष सारूक मुक्काम पोस्ट जीवाचीवाडी तालुका केज जिल्हा बीड यांनी केली आहे महोदय, या विषयी सविस्तर वृत्त असे की गावांमधील बुडीत क्षेत्रातल्या विहिरीमध्ये गावांमधील काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून मोटर टाकले आहेत त्याच्यामध्ये ग्रामविकास अधिकारी हे प्रथम दोषी आहेत त्यामुळे जीवाचीवाडी ग्रामपंचायत अंतर्गत पाणीपुरवठा खंडित आहे या अनुषंगाने तात्काळ पाणीटंचाई प्राधान्य या अनुषंगाने सदरील ग्रामविकास अधिकारी यांच्यावर तात्काळ कारवाई करून यांची बदली करण्यात यावी मे. साहेबांना अशी विनंती करतो की मा. ग्रामविकास अधिकारी यांच्या आशीर्वादाने गावातील पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे तात्काळ त्यांची बदली करण्यात यावी. ग्राम विकास अधिकारी यांच्या वरिष्ठ अधिकारी यांच्याशी लेखी पान २ वर

## तापमानाचा बसला मोठा फटका

### दाहकता:सोळंके कारखान्याच्या बगॅजला आग

पुण्यभूमी प्रतिनिधी



तेलगाव:लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या बगॅज व इतर साहित्याला शुक्रवारी दुपारी अचानक आग लागली.या आगीत कारखान्याचे लाखो रूपयाचे नुकसान झाल्याची माहिती असुन, सदरील आग अति तापमानामुळे लागली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.तर आग आटोक्यात आणण्यासाठी कारखान्यासह धारूर, वडवणी,माजलगाव येथील अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी वेळीच आग आटोक्यात आणण्यात यश मिळवले.अन्यथा खुप मोठी दुर्घटना घडली असती.

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या बगॅज कनव्हेअरला दि.२मे शुक्रवार रोजी दुपारी बारा ते सव्वा बारा वाजे दरम्यान अचानक आग लागली. कांही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण करीत आग मोठ्या प्रमाणात फलावली. यात मोठ्या प्रमाणात बगॅज जळालाच शिवाय तेथे असलेले इतर साहित्यासही आग लागुन ते जळुन खाक झाले.ही आग लागल्याचे लक्षात येताच तेथे ड्युटीवर असलेल्या कर्मचाऱ्यांनी कारखाना कार्यालयास कळवले असता तेथून तात्काळ कारखान्याच्या अग्नीशमन बंबास पाचारण करून आग विझवण्याचा प्रयत्न केला.परंतु आग वाढतच असल्याने कारखाना कार्यालयाने माजलगाव, वडवणी, धारूर येथील नगर परिषदच्या अग्नीशमन बंबास ही पाचारण केले.या तिन्ही ठिकाणाहून कांही वेळात कारखाना येथे अग्नीशमन बंब आले. त्यांनी शर्तीचे प्रयत्न करत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. चार अग्नीशमन बंबाच्या सहाय्याने एक तासात आग पान २ वर

## बीडमध्ये गौरव रथयात्रेचे स्वागत

### डॉ.योगेश क्षीरसागर:गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ६५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून आयोजित गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५ अंतर्गत निघालेल्या गडकिल्ले, माती आणि नद्यांचे जल-कुंभ रथयात्रेचे बुधवारी (दि.३०) दुपारी १ वाजता बीडमध्ये जल्लोषात स्वागत करण्यात आले.

या गौरव रथयात्रेच्या माध्यमातून राज्याच्या निर्मितीत मोलाचे योगदान देणाऱ्या थोर महापुरुषांचा परिचय नव्या पिढीसमोर मांडला जात असून, महाराष्ट्राच्या इतिहासाला उजाळा देण्याचा हेतू ठेवण्यात आला आहे. ही रथयात्रा संपूर्ण राज्यभर फिरणार आहे. बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ही यात्रा पोहोचल्यावर विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात स्वागत झाले. स्वागत समारंभावेळी प्रमुख समन्वयक आमदार विक्रम काळे, राष्ट्रवादी सेवादलाचे राज्य पान २ वर

## साळवे | सरकारी धान्याचा काळा बाजार

# राहुरीत सरकारी धान्यावर डल्ला?

पुण्यभुमी प्रतिनिधी



राहुरी:येथील महसूल विभाग अंतर्गत असलेल्या अन्न धान्य पुरवठा विभागात मोठ्या प्रमाणावर काळा बाजार चालू असल्याची चर्चा तालूक्यात सुरु आहे. पुरवठा अधिकारी व तहसिलदार या बाबत चौकशी का करत नाही? महसूल विभागातील अधिकारी या काळ्या बाजारात सामील आहेत का? असा प्रश्न सर्व सामान्य नागरिकांना पडला आहे. सदर गोडाऊन किपर व मुकादमाची चौकशी करावी. अन्यथा तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा वंचितचे पिंटूनाना साळवे यांनी दिला

वंचित चे पिंटूनाना साळवे म्हणाले कि, गोर गरीब जनतेला कमी भावात अन्न धान्य पुरवठा व्हावा. यासाठी शासनाकडून शहरा पासून ते गाव पातळी पर्यंत स्वस्त धान्य दुकान चालवीले जातात. मात्र राहुरी येथील पुरवठा विभागात शासनाकडून आलेले धान्य दिवसा ढवळ्या काही कारण नसताना या गाडीतून त्या गाडीत भरत असतात. काही वेळा रात्रीच्या दरम्यान खाजगी वाहनातून सरकारी धान्याची वाहतूक केली जाते. ते धान्य काळ्या बाजारात विकले जात असल्याचे समजले आहे. शासनाकडून आलेले धान्याचे कट्टे खोलून प्रत्येक कट्ट्या मधून ४ ते ५ किलो धान्य चोरले जात असल्याची शंका वाटत आहे. शासनाकडून आलेल्या कट्ट्याचे वजन ५० किलो ५०० ग्रॅम करुन ते स्वस्त धान्य दुकानदारा पर्यंत गेले पाहिजे. परंतू यामध्ये गोडाऊन किपर व मुकादम हे प्रत्येक कट्ट्यातून धान्य चोरुन काळ्या बाजारात विकतात. श्रीरामपुर, राहता, राहुरी पारनेर येथील हमालकीचा ठेका हा सुमारे आठ ते दहा वर्षापासून एकाच मुकादमाकडे आहे. सदर मुकादम व राहुरी येथील गोडाऊन किपर यांची तसेच त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी.

धान्याच्या या काळ्या बाजारात गोडाऊन किपर व मुकादम यांना पुरवठा विभागातील व महसूल विभागातील पान २ वर

## मुंडेवाडी येथे अवैध दारू विक्री

### मागणी:पोलिसांनी कारवाई करावी

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज: तालुक्यातील मुंडेवाडी येथील श्री संत भगवान बाबा चौक परिसरात अवैध दारू विक्री करणाऱ्या दुकानावर तातडीने कारवाई करण्यात यावी कार मुंडेवाडी येथे अवैध दारू विक्रीमुळे जिवीतहानी होऊ लागली आहे तसेच गावातील तरुण पिढी परबाद होत आहे त्यामुळे मुंडेवाडी येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या वर कार्यवाही केली का जात नाही असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण मुंडेवाडी येथील अनेक नागरिक त्रस्त झाले आहेत कारण एन चौकात दारु विक्री केली जात आहे अशा निकट वर्तीय अवैध दारू विक्री करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणीही नागरिकांन कडुन करण्यात येत आहे परंतु पोलिस प्रशासन कार्यवाही कधी करणार का पोलीस प्रशासन चेरीमेरीत खुश आहे कारण मुंडेवाडी गावात अनेक तरुण व्यसनाधीन होत चालले आहे दारु पिऊन तसेच अनुचित प्रकार सुध्दा घडु लागले आहेत त्यामुळे केज पोलीस स्टेशनने मुंडेवाडी येथील श्री संत भगवानबाबा चौक परीसरात अवैध दारू विक्री करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे. पान २ वर